MAHMAR/2018/75864

# पर्यावरण संस्कृती

* वर्ष : ४ थे * अंक : ९ वा * माहे : मार्च २०२२ * पृष्ठ संख्या : ४० * किंमत : ५० रुपये

## नद्यांमधील वाढते प्रदूषण



# आता सर्वत्र उपलब्ध

अगदी अल्प कालावधीत महाराष्ट्रातील जनमाणसात रुजलेले, पर्यावरणाच्या विषयांचे सखोल अभ्यास, विवेचन आणि वैविध्यपूर्ण अशी माहितीने सखोल ज्ञान देणारे 'पर्यावरण संस्कृती' मासिक आता सर्वत्र उपलब्ध आहे. आपल्या नजीकच्या विक्रेत्यांशी आजच संपर्क साधा




# जाहिरात दर

| पान | साईज | दर |
| --- | --- | --- |
| आतील पान (कृष्णधवल) | ६ x ८'' | १०,०००/- |
| आतील पान (रंगीत) | ७ x ९'' | १५,०००/- |
| बॅक इनर (रंगीत) | ७ x ९'' | २५,०००/- |
| मलपृष्ठ (रंगीत) | ७ x ९'' | ५०,०००/- |

| पान | साईज | दर |
| --- | --- | --- |
| आतील पान (कृष्णधवल) | ६ x ४'' | ५,०००/- |
| आतील पान (रंगीत) | ७ x ४.५'' | ७,५००/- |
| बॅक इनर (रंगीत) | ७ x ४.५'' | १५,०००/- |


❋ आमचा पत्ता ❋

पर्यावरण संस्कृती

नागेश्वरी नगर, दामाजी नगर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर (महाराष्ट्र) ४१३ ३०५.

Email : paryavaransanskriti@gmail.com


**For Payment**

**Paryavaran Sanskriti**
Ratanchand Shah Sahakari Bank Ltd, Mangalwedha
Dist- Solapur
Ac No-1002014000722
IFSC Code-UTIB0SRSSB1

टीप : वरील संपूर्ण माहिती ही आपल्या सुंदर हस्ताक्षरात भरुन मासिकाच्या पत्त्यावर पाठवून द्यावे.

## संपादकीय

# युद्धाचे पर्यावरणावरील दुष्परिणाम

रशिया आणि युक्रेन यांच्यातील वादाचे सावट संपूर्ण जगावर पडले आहे. हे युद्ध केंव्हा संपेल हे काही सांगता येत नसले तरी त्याचे पडसाद संपूर्ण जगावर होणार आहेत. यामुळे केवळ युक्रेनचे नुकसान होईल, असे नाही तर जगभरातील पर्यावरण धोक्यात आले आहे. विविध ठिकाणी होणारा बॉम्बचा वर्षाव, मानवी आयुष्यासोबतच हजारो सजीव वनस्पती, झाडे, जीव यांची होणारी अपरिमित हानी ही न मोजता येण्यासारखी आहे.


रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी कोणतेही कारण देऊन हे युद्ध सुरू केले असले तरी भविष्यात याचे परिणाम अत्यंत वाईट होतील असे दिसते आहे. भूकेने व्याकुळ नागरिक, मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर सोबतच प्राण्यांना गमवावा लागणारा जीव हे पाहताना सामान्यांना निश्चितपणे दु:ख झाल्याशिवाय राहणार नाही. मानवी हानी ही मोजता येत नाही, त्याचप्रमाणे या युद्धामुळे पर्यावरणावरची हानी मोठी झाली आहे. प्रचंड आवाज, आगीचे लोळ, खायला न मिळणारे अन्न यामुळे पशू-पक्ष्यांना आपला जीव गमवावा लागला आहे. याची गणती होत नसली तरी हे नुकसान प्रचंड मोठे आहे.

कोणताही साम्राज्यविस्तार हा केवळ भौगोलिक नसतो, तर त्यामुळे होणारे बदल न सांगण्यापलीकडे असतात. महिला आणि लहान मुलांच्या भवितव्याचा प्रश्न असतो. युद्धात सर्वप्रथम यांना मोठा फटका बसतो. हे नुकसान कमीत कमी करायचे असेल तर त्यासाठी हे युद्ध थांबले पाहिजे. जगभरातील नेत्यांनी पुतीन यांच्यावर दबाव आणणे आवश्यक आहे. पुतीन अशा दबावाला भीक लागत घालत नसले तरी याचा अप्रत्यक्ष परिणाम हा प्रत्येक देशावर होणार आहे. याची जाणीव करून न दिल्यास भविष्यात याचे वाईट परिणाम दिसून येतील.

भारतावरही याचे परिणाम निश्चित होणार आहेत. भारतील हजारो नागरिक युक्रेनमध्ये राहतात. काही शिक्षणाच्या निमित्ताने गेले आहेत. त्यांना भारतात परत आणणे ही आपली प्राथमिकता तर असणारच आहे. त्याशिवाय तेलाचे भावही येत्या काही दिवसात वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्याकडेही लक्ष देणे हे सरकारचे काम आहे.

**धन्यवाद !**

**- संपादक**



# सदस्य व्हा

पर्यावरण आणि विकासासंदर्भातील प्रश्नांची जाणीव व्हावी या उद्देशाने आम्ही **'पर्यावरण संस्कृती'**चा अंक घेऊन येत आहोत. या मासिकामध्ये पर्यावरण, आरोग्य, विकास, प्रदूषण, कृषी, विज्ञान यांच्या संदर्भातील फिल्ड रिपोर्ट, त्यासंदर्भातील वृत्त आणि लेख देण्यात येणार आहेत. मराठीत असलेले हे मासिक ग्रामीण भागापासून ते शहरी भागातील नागरिकांसाठी महत्वाची भूमिका बजावेल. सरकारी योजना, त्याची अंमलबजावणी लोकापर्यंत पोहोचविण्याचे काम या माध्यमातून केले जाणार आहे. त्याशिवाय पर्यटन, जैवविविधता, बदलते हवामान याची इत्यंभूत माहिती याद्वारे लोकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा ध्यास असणार आहे.

या माध्यमातून घडणाऱ्या घटनांचा परामर्श घेतला जाईल. भविष्यकाळ उज्वल असावा या दृष्टीकोनातून आम्ही करीत असलेल्या प्रयत्नांना आपली साथ असणे आवश्यक आहे. तुमचे पाठबळ आम्हाला हे कार्य करण्यास प्रेरणा देईल. **'पर्यावरण संस्कृती'** च्या माध्यमातून पर्यावरण आणि विकासासाठीच्या पत्रकारितेला आपल्या मदतीची आवश्यकता आहे.

# सदस्यता फॉर्म

सदस्याचे नाव: श्री/श्रीमती ______________________________

पत्ता: ______________________________

पिन कोड: ☐☐☐☐☐☐ फोन/मोबाईल. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

ई मेल– ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

मी या सदस्यता फॉर्मसोबत........................ (रोख/मनी ऑर्डर/चेक/डिमांड ड्राफ्ट) द्वारे पाठवित आहे. कृपया मला पर्यावरण संस्कृतीसाठी सदस्यता मिळावी ही विनंती.

चेक/डिमांड ड्राफ्ट क्रमांक : ............................................ तारीख: / /२०

(चेक /डी डी)**पर्यावरण संस्कृती** या नावाने पाठवावा.

**आपण कोणत्या प्रकारचे सदस्य होऊ इच्छिता त्या बॉक्स वर ☑ खुण करा**

(आपण कोणत्याही महिन्यापासून सभासद होऊ शकता.)

अंक घरपोच सेवेसाठी

| अंक | किंमत | सवलतीसह | |
|---|---|---|---|
| ३ वर्षे (३६ अंक) | १,८०० /- | १,५०० /- | ☐ |
| २ वर्षे (२४ अंक) | १२०० /- | ९०० /- | ☐ |
| १ वर्षे (१२ अंक) | ६०० /- | ५०० /- | ☐ |

अंक या ठिकाणी उपलब्ध:

* श्री. बी. डी. बागवे, न्यूज पेपर एजंट, ५/१२, उपेंद्रनगर, सेनापती बापट मार्ग, दादर-मुंबई,
* श्री. पाठक ब्रदर्स, ६० फुटी रोड, सहकार नगर, सिद्धेश्वर को-ऑप हौसिंग सोसायटी, नाशिक,
* संदेश एजन्सी, ६५८, नारायण पेठ, पूनम एजन्सी, २३ बुधवार पेठ, महालक्ष्मी चेंबर्स, अप्पा बळवंत चौक, पुणे-२
* पाठक ब्रदर्स, शॉप नं. ७, मेहेर प्रसाद कॉम्प्लेक्स, हॉटेल सेंट्रल पॉईंटच्या बाजूला, रामदास पेठ, नागपूर, अपर्णा एजन्सी, दत्त चौक, सोलापूर.


✻ आमचा पत्ता ✻

**पर्यावरण संस्कृती**

नागेश्वरी नगर, दामाजी नगर,ता. मंगळवेढा, जि. सोलापूर (महाराष्ट्र) ४१३ ३०५.

Email : paryavaransanskriti@gmail.com


**For Payment**

**Paryavaran Sanskriti**
Ratanchand Shah Sahakari
Bank Ltd, Mangalwedha
Dist- Solapur
Ac No-1002014000722
IFSC Code-UTIB0SRSSB1

टीप : वरील संपूर्ण माहिती ही आपल्या सुंदर हस्ताक्षरात भरुन मासिकाच्या पत्यावर पाठवून द्यावे.

# पर्यावरण संस्कृती

* वर्ष : ४ वा * अंक : ९ वा * माहे : मार्च २०२२ * पृष्ठ संख्या : ४० * किंमत : ५० रुपये

कार्यकारी संपादक
**प्रा. रेश्मा माने**

सल्लागार मंडळ
**श्री. राहुल शहा**
**ॲड. भीमराव कोंडुभैरी**
**डॉ. सुभाष कदम**

पुणे कार्यालय
**रेश्मा माने,**
फ्लॅट नं. ३०५, अंजना रेसीडेन्सी,
मांगडेवाडी, कात्रज, पुणे.

संपर्क
Email : paryavaransanskriti@gmail.com

भ्रमणध्वनी
८२७५२०६६०२

## अंतरंग

| लेख | पृष्ठ क्र. |
|---|---|
| नद्यांमधील वाढते प्रदूषण | ०६ |
| ताडोबा प्रकल्पाचा विकास | १० |
| सह्याद्री देवराईला आग | १२ |
| पर्यावरणीय जीवनशैली | १४ |
| ठाणे खाडीला रामसर दर्जा | १६ |
| ग्रामीण भागात पाण्याचे दुर्लक्ष | १८ |
| डोंबिवलीतील धोकादायक कारखाने | १९ |
| कृषी पंपाची संजीवनी | २० |
| खारफुटी जंगलसंवर्धनाचे कौतुक | २२ |
| शाश्वत कृषी पर्यटन | २३ |
| सलीम अली अभयारण्याचा विकास | २५ |
| कोकण विकासाची गुरुकिल्ली | २६ |
| इरई नदीचे खोलीकरण | २९ |
| जगातील सुंदर पर्यटन स्थळात सिंधुदुर्ग | ३१ |
| बाळासाहेब ठाकरे जैवविविधता विरंगुळा उद्यान | ३३ |
| सौंदर्याची प्रचिती | ३५ |
| उन्हाळ्यात टरबूज खा | ३८ |
| सौंदर्याचा खजिना आंबा | ४० |

हे पत्र मुद्रक ज्ञानेश्वर गुंडोपंत कुलकर्णी यांनी प्रकाशक एस.यु.इनामदार व मालक एस.यु. इनामदार यांच्याकरिता माऊली प्रिंटींग प्रेस, चेळेकर गल्ली, मंगळवेढा, ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथे छापून नागेश्वरी नगर, श्री संत दामाजीनगर, ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथे प्रसिद्ध केले. संपादक जमीर उस्ताद इनामदार
MAHMAR /2018/75864

# लोकनिरीक्षण

### हरित हायड्रोजनची गरज

हरित हायड्रोजनबाबतचा लेख वाचला. अत्यंत सुंदर लेख आहे. सध्या ज्या पद्धतीने इंधनामुळे पर्यावरणाची अतोनात हानी होत आहे, ती टाळण्यासाठी हरित हायड्रोजनची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. याबाबत आपण प्रसिद्ध केलेला लेख अत्यंत माहितीपूर्ण होता.

**– सुरेंद्र पटवर्धन, ठाणे**

### वाघांचे संरक्षण हवे

वाघांच्या संरक्षणासाठी राज्य सरकारने उचललेले पाऊल महत्वाचे आहे. राज्यात यंदा वाघाचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे त्यांची निगा राखणे, काळजी घेणे हे आपले काम आहे. येत्या काळात वाघांची संख्या आणखी वाढावी म्हणून राज्य सरकारने तातडीने याबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**– राजेश पिल्लेवार, चंद्रपूर**

### हवामान केंद्राचा निर्णय योग्य

ग्रामपंचायतीमध्ये हवामान केंद्र उभारण्यात येणार असल्याचे कृषीमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले आहे. पीक विमा योजनेत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर याचा फटका बसला आहे. एकाच मंडलात पाऊस पडणारे एक जरी गाव असले तरी त्याचा मोठा तोटा होतो कारण केवळ त्याच गावची नोंद सगळ्या क्षेत्राची मोजली जाते. आता मोठ्या गावांमध्ये ही केंद्रे बसविली जाणार असल्याने शेतकऱ्यांना याचा फायदा होईल.

**– अशपाक पटेल, लातूर**

### पदपथाचा योग्य उपयोग

जनतेसाठी पदपथ या केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत राज्यातील चार शहरांचा समावेश होता. खरं तर वाढत्या लोकसंख्येसोबत वाहनांची संख्या वाढल्याने पदपथाची मोठ्या संख्येने गरज आहे. अशा स्थितीत अशा पदपथांचा योग्य वापर केल्यास निश्चितपणे चांगला परिणाम होईल.

**– शैला पाटील, पिंपरी चिंचवड**

### बांबूचा वापर वाढावा

लातूर जिल्ह्यातील सलगरा गावी १०० एकरावर बांबू लागवड करण्यात आली आहे. हा अत्यंत योग्य उपक्रम जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी घेतला आहे. खरोखर बांबू हे सर्वसामान्यांना परवडणारे आहे. यातून चांगले उत्पन्नही मिळू शकते. त्यामुळे ग्रामीण भागात बांबूचे उत्पादन मोठ्या संख्येने घेण्याची गरज आहे.

**–राजाराम पवार, बीड**

### ‘कॉलरवाली वाघीण’ अभिमानास्पद

गेल्या महिन्यात कॉलरवाली वाघिणीचा मृत्यू झाला. या वाघिणीने २९ बछड्यांना जन्म दिला. ही वाघीण माणसाळलेली असल्याने तिचा मानवाला त्रास झाला नाही. या कॉलरवाली वाघिणीने वन्यजीवांच्या वाढीसाठी केलेले प्रयत्न हे वाखाणण्याजोगे आहेत. त्यामुळे तिचा मृत्यू हा निश्चितपणे धक्कादायक आहे.

**–सुरज जाधव, नाशिक**

### वनाच्छेदनात वाढ आनंदाची गोष्ट

राज्याच्या वनाच्छेदनात वाढ झाल्याच्या वृत्ताने निश्चितपणे आनंद झाला. अतिघनदाट वन प्रकारात १३ चौ. कि. मी. ने तर मध्यम घनदाट वनांमध्ये १७ चौ. कि. मी. ने वाढ झाली आहे. राज्याने केलेल्या प्रयत्नामुळे आणि त्याला नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे हे शक्य झाले आहे. याबद्दल सर्वांचे अभिनंदन

**–प्रगती देशमुख, पुणे**

### वजन कमी करण्याच्या टिप्स छान

आपल्या मासिकात वजन कमी करण्याच्या टीप्सबाबत दिलेली माहिती योग्य होती. आम्हीही वजन कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आपण दिलेल्या माहितीचा निश्चितपणे उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे.


**–संजना पाटील, नागपूर**

गंगा ही भारतातील सर्वात पवित्र नद्यांपैकी एक आहे. नदी ही आशा, श्रद्धेचे प्रतीक आहे आणि तिच्या शुद्धतेमुळे तिची पूजा केली जाते. मात्र, मानवाच्या चुकीमुळे नदीचे पाणी सातत्याने प्रदूषित होत आहे. नद्यांच्या आजूबाजूच्या शहरांतील सांडपाणी नदीचे गंभीर प्रदूषण करीत आहे. गंगा ही हिंदी महासागराच्या बंगालच्या उपसागरात वाहून जाते आणि त्यामुळे तिच्यावर भरती–ओहोटीचा परिणाम होतो. हवामान आणि पावसाळ्याचाही नदीवर परिणाम होतो.

आता भारताच्या पश्चिम बंगालमधील गंगा नदीबद्दल एक नवीन विश्लेषण केले गेले आहे. नदीत वाहणारे सांडपाणी नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेवर कसा परिणाम करते यावर विश्लेषण प्रकाश टाकते. ऋतूंच्या बदलाने, विशेषत: भरती–ओहोटी आल्यावर ते कसे बदलते? कोलकाता येथील जाधवपूर विद्यापीठाच्या सायंती कार, आशुतोष महाविद्यालय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी संयुक्तपणे हा अभ्यास केला होता.

गंगा नदीवरील भरती–ओहोटी आणि हवामानाचा परिणाम अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी सायंती कार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी

# नद्यांमधील वाढते प्रदूषण



२०१४ आणि २०१८ दरम्यान पाण्याच्या गुणवत्तेचे सर्वसमावेशक विश्लेषण केले. त्यांनी विशेषतः हावडा स्टेशनच्या दरम्यान असलेल्या पश्चिम बंगाल, भारतातील नदीच्या पट्ट्यावर लक्ष केंद्रित केले ज्यामध्ये कोलकाता जवळील प्रमुख रेल्वे स्टेशन आणि खर्डा शहराचा समावेश आहे.

एका विस्तृत सर्वेक्षणानंतर, संशोधकांनी पाच प्रमुख नदीचे मुख निवडले ज्यामार्गे शहराचे सांडपाणी गंगेत वाहते. हावडा येथील घुसुरी बागबाजार येथील वर्तुळाकार कालवा, २४ परगणा (उत्तर) येथील दक्षिणेश्वर कालवा, हावडा येथील बल्लीखल आणि २४ परगणा (उत्तर) मधील खर्डा खल (टीटागढ खाल म्हणूनही ओळखला जाणारा) यांचा यात समावेश आहे.


प्रत्येक मुखावर चार वर्षांपर्यंत, त्यांनी वेगवेगळ्या परिमाणानुसार नदीच्या पाण्याच्या गुणवत्तेचे परीक्षण केले. विरघळलेला ऑक्सिजन आणि जैवरासायनिक ऑक्सिजनची मागणी, तसेच विविध जड धातू आणि विष्ठा कॉलिफॉर्मची पातळी, मानवी मलमूत्रातून होणारे प्रदूषण यांचा समावेश होता.

संशोधकांनी नोंदवले की, जीआयएस मॅपिंगचा देखील विश्लेषणामध्ये समावेश करण्यात आला आहे. विरघळलेला ऑक्सिजन आणि बायोकेमिकल ऑक्सिजनची मागणी तसेच नायट्रेट नायट्रोजन आणि क्लोराईडची पातळी पावसाळ्यापूर्वी प्रत्येक पाच ठिकाणी लक्षणीयरित्या जास्त असल्याचे दिसून आले.

याव्यतिरिक्त, हेवी मेटल आणि विष्ठा कॉलिफॉर्म पातळी एकमेकांशी संबंधित आहेत. एकाचे मोजमाप दुसऱ्याबद्दल अनुमान काढण्यासाठी वापरले जाऊ शकते. संशोधकांनी त्यांच्या सांख्यिकीचा वापर पाच ठिकाणी वेगवेगळ्या पाण्याच्या गुणवत्तेच्या मापदंडांवर भरतीच्या प्रभावाचे गणितीय मॉडेल करण्यासाठी केला.

एकंदरीत, गंगेच्या या भागातील सांडपाणी हंगामी आणि भरती-ओहोटीच्या परिस्थितीनुसार, गंगेच्या पाण्याच्या गुणवत्तेवर कसा परिणाम करते याविषयी विश्लेषण नवीन माहिती देते. ही माहिती लोकांना नदीच्या पाण्याच्या सुरक्षित वापरासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे देण्यास मदत करू शकते.

संशोधकांचे म्हणणे आहे की, गंगा नदी लाखो लोकांच्या श्रद्धेचे आणि आशेचे प्रतीक तर आहेच, पण दैनंदिन वापरासाठी आणि पशुधन व्यवस्थापनासाठीही ती महत्त्वाची आहे. कोलकात्याच्या आशुतोष कॉलेज, जादवपूर विद्यापीठ आणि नवाजो टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या सहकार्याने नदीच्या प्रभावाचा अभ्यास करण्यात आला. नदीच्या पाणी वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी निवडलेल्या नदीच्या पट्ट्यांमधील पाण्याच्या बाहेर पडण्याच्या बिंदूंमधून नदीत प्रवेश करणाऱ्या प्रदूषकांच्या प्रवाहावर भरतीची गतिशीलता आणि हवामानातील बदल यांचा समावेश करण्यात आला आहे. ओपन-एक्सेस जर्नल



पीएलओएस वॉटरमध्ये हा अभ्यास प्रकाशित झाला आहे.

जलशक्ती मंत्रालयाच्या मते, गंगा खोरे हे पाणलोट क्षेत्राच्या दृष्टीने भारतातील सर्वात मोठे नदीचे खोरे आहे, जे देशाच्या एकूण भूभागाच्या (८, ६१, ४०४ चौरस किमी) २६ टक्के आहे. भारत, नेपाळ आणि बांगलादेशात पसरलेले १०,८६,००० किमी क्षेत्र व्यापून हे खोरे उत्तर अक्षांशांच्या दरम्यान आहे. गंगेच्या खोऱ्यातील सुमारे ७९ टक्के क्षेत्रफळ भारतात आहे. खोऱ्यात उत्तराखंड, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, हिमाचल प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल आणि दिल्ली या ११ राज्यांचा समावेश आहे. पश्चिम बंगालमध्ये ७१, ४८५ किमीचे ड्रेनेज क्षेत्र आहे.

गंगा खोऱ्यात दररोज सुमारे १२,००० दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाणी तयार होते, ज्यासाठी सध्या फक्त ४,००० एमएलडीची प्रक्रिया करण्याची क्षमता आहे. गंगा नदीच्या काठावर वसलेल्या टियर एक आणि दोन शहरांमधून सुमारे ३००० एमएलडी सांडपाणी सोडले जाते, ज्याच्या तुलनेत आतापर्यंत सुमारे १००० एमएलडीची प्रक्रिया क्षमता निर्माण झाली आहे. औद्योगिक प्रदूषणाचे प्रमाण प्रमाणानुसार २० टक्के आहे. परंतु त्यात विषारी व नाशवंत कचरा असल्याने त्याचा मोठा परिणाम होतो. रामगंगा आणि काली नद्यांचे पाणलोट क्षेत्र आणि कानपूर शहरातील औद्योगिक क्षेत्र हे औद्योगिक प्रदूषणाचे महत्त्वाचे स्रोत आहेत. कानपूरमधील कोसी, रामगंगा आणि काली नद्यांच्या पाणलोट क्षेत्रातील टॅनरी, डिस्टिलरी, पेपर मिल आणि साखर कारखाने प्रामुख्याने जबाबदार आहेत.



जगभरातील नद्यांमधील औषध किंवा फार्मास्युटिकल प्रदूषणावरील अभ्यासात दिल्ली आणि हैदराबादसह जगभरातील नदीच्या पाण्याच्या नमुन्यांचे मूल्यांकन केले गेले. नदीच्या नमुन्यांमध्ये मधुमेह, अपस्मार आणि वेदना कमी करणारी औषधे आढळून आली आहेत. जे पर्यावरण आणि लोकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आहे. नद्यांमधील औषधी अवशेष शोधून त्याचे मोजमाप करण्याचा हा पहिला अभ्यास आहे. भारतासारख्या कमी–मध्यम–उत्पन्न असलेल्या देशांतील नद्यांमध्ये फार्मास्युटिकल प्रदूषणाची उच्च पातळी आढळून आली आहे, ज्यात मोठ्या प्रमाणात औषधी उत्पादन क्षमता आहे परंतु पर्यावरणीय नियम ढिले आहेत.

कार्बामाझेपाइन, मेटफॉर्मिन आणि कॅफिन सारख्या ६१ औषधांची उपस्थिती मोजण्यासाठी या अभ्यासात जगभरातील २५८ नद्यांचे मूल्यांकन केले गेले. अभ्यास केलेल्या या नद्यांपैकी ३६ देशांतील नद्यांवर यापूर्वी कधीही औषधनिर्मितीसाठी निरीक्षण केले गेले नव्हते. यानोमामी या दुर्गम व्हेनेझुएलाच्या गावात, जे आधुनिक औषधे वापरत नाहीत, नमुन्यांमध्ये एकूण सक्रिय औषध अंश किंवा फार्मास्युटिकल घटक (एपीआय) च्या सरासरी एकाग्रतेमध्ये शून्य आढळले. लंडनमध्ये त्यांचे प्रमाण ३,०८० नॅनोग्राम प्रति लिटर, तर दिल्लीत ४६,७००

ते लाहोरमध्ये सर्वाधिक ७०,७०० इतके आढळले.

जॉन विल्किन्सन, यूकेमधील यॉर्क विद्यापीठातील पर्यावरण संशोधक, ज्यांनी या अभ्यासाचे नेतृत्व केले. त्यांनी सांगितले, आम्हाला जवळपास दोन दशकांपासून माहित आहे की औषधी पदार्थ पाण्याच्या स्त्रोतांमध्ये प्रवेश करतात, जिथे ते सजीवांवर परिणाम करू शकतात. आतापर्यंत जवळपास सर्व अभ्यास उत्तर अमेरिका, युरोप आणि चीनवर केंद्रित आहेत. फार्मास्युटिकल प्रदूषणामुळे प्रत्येक खंडातील पाणी दूषित होत असल्याचे अभ्यासात म्हटले आहे. देशाची सामाजिक–आर्थिक स्थिती आणि तेथील नद्यांमधील औषधी प्रदूषणाची उच्च पातळी यांच्यात मजबूत संबंध आहे. ज्यामध्ये कमी–मध्यम उत्पन्न असलेल्या देशांतील नद्या सर्वाधिक प्रदूषित आहेत.

नद्यांच्या काठावर कचरा साचणे किंवा टाकणे, कचरा विल्हेवाटीच्या पायाभूत सुविधांचा अभाव आणि अवशिष्ट सेप्टिक टँक कचरा नद्यांमध्ये टाकणे यामुळे बहुतेक औषध प्रदूषण होते.

विल्किन्सन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिल्ली आणि हैदराबादच्या शास्त्रज्ञांसह, दिल्लीतील यमुना नदी आणि हैदराबादमधील कृष्णा आणि मुसी नद्यांसह १०४ देशांमधील २५८ नद्यांमधील १,०५२ नमुन्यांमधील औषधांच्या एकाग्रतेचे विश्लेषण केले.

जगभरातील सॅम्पल केलेल्या साइट्सपैकी एक चतुर्थांश ठिकाणी, किमान एका औषधात जलचरांसाठी सुरक्षित मानल्या जाणाऱ्या पातळीपेक्षा जास्त ट्रेस आढळले आहेत, असे अभ्यासात म्हटले आहे. तथापि, अशा प्रदूषणामुळे मानवांना होणाऱ्या हानीचा अद्याप कोणताही थेट पुरावा नाही. शास्त्रज्ञ चिंतित आहेत की जर जलचर जीवांच्या शरीरातील औषधाचे प्रमाण लोकांच्या आहारासाठी आवश्यक असलेल्या उपचारात्मक एकाग्रतेच्या पातळीपर्यंत पोहोचले तर त्याचा परिणाम मानवांवर होऊ शकतो.

वातावरणात प्रतिजैविकांची उच्च पातळी देखील सूक्ष्मजंतूंमध्ये औषध प्रतिरोध वाढवू शकते. जगभरातील ६४ ठिकाणी सिप्रोफ्लॉक्सासिन सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. १३ पैकी नऊ प्रतिजैविक सांद्रता कमीत कमी एका नमुना केलेल्या साइटसाठी सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळले.

संशोधकांनी सुचवले आहे की भविष्यात त्यांचा दृष्टीकोन इतर पर्यावरणीय उपकरणे जसे की गाळ, माती आणि बायोटा समाविष्ट करण्यासाठी आणि प्रदूषणावर जागतिक स्तरावरील डेटासेट तयार करण्यासाठी विस्तारित केला जाऊ शकतो. हा अभ्यास प्रोसिडिंग्स ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रकाशित झाला आहे.

■■■



# ताडोबा प्रकल्पाचा विकास




**ताडोबा प्रकल्प सुरू**

कोविड नियमावलीचा आधार घेत राज्य शासनाने बंद केलेली ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटन व सफारी २ फेब्रुवारीपासून पुन्हा सुरू करण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण घेतला आहे. मात्र, ही सफारी आता कोविड नियम व अटी शर्तींचे पालन करूनच करता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. ताडोबाची सफारी करताना पर्यटक, मार्गदर्शक, जिप्सीवाहक, निसर्ग मार्गदर्शक, गेट मॅनेजर व कर्मचाऱ्यांनी लसीकरण केलेले असणे अनिवार्य आहे. कोविड लसीचे दोन डोस घेतलेले असले, तरी दुसरा डोस घेऊन १४ दिवस होणे अपेक्षित आहे. ज्यांना लस घेण्यास मुभा नाही, अशांना मान्यताप्राप्त डॉक्टरांचे प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे. मास्क नसणाऱ्यांना १०० रुपये दंड ठोठावला जाणार आहे. यासह कोविडच्या सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या अटींवरच सफारीला परवानगी मिळालेली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा हे वाघ बघण्याचे जागतिकस्तरावरचे सर्वोत्तम स्थळ व्हावे, यादृष्टीने पर्यावरण रक्षणाचे भान राखत पर्यटन विकासाचा एकात्मिक आराखडा तयार करावा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वन विभागास दिल्या. यासाठी आवश्यक असणारा निधीही टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाईल, असे ते म्हणाले.

चंद्रपूर शहरालगत व्याघ्र सफारी आणि वन्यजीव बचाव केंद्र उभारणीला गती द्या, तेथे मोठ्या प्रमाणात वनीकरण करा, जेणेकरून वन्यजीवांना नैसर्गिक अधिवास मिळू शकेल. वन अकादमीनजीक वन्यजीव रेस्क्यू सेंटरला सेंट्रल झू थॉरिटीची मंजुरी मिळालेली आहे. याला जोडूनच व्याघ्र सफारी करण्याचेही प्रस्तावित आहे. या दोन्ही प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोअर व बफर क्षेत्रातील बांबूला फुलोरा येण्यास सुरुवात झाली असून, यासंबंधीचा नियोजन आराखडा तयार


करण्यात आला आहे. यात बांबू कुपांची कामे, जाळरेषेचा विस्तार, अतिरिक्त अग्नि संरक्षक मजूर लावणे, बिनतारी संदेशन यंत्रणेचे बळकटीकरण करणे, बांबू बिया गोळा करून सीड बॉल तयार करणे अशा विविध कामांचा समावेश करण्यात आला आहे. यासाठीही निधीची तरतूद करण्याचे निर्देश यावेळी मुख्यमंत्री यांनी दिले.

यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार सीताराम कुंटे, अपर मुख्यसचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, वन विभागाचे प्रधान सचिव वेणु गोपाल रेड्डी, प्रभारी वनबल प्रमुख वाय.एल.पी.राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, यांच्यासह वन विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

राज्य वन्यजीव मंडळाच्या १७ व्या बैठकीत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील अंधारी अभयारण्याचा क्षेत्र विस्तार करण्यास व हे क्षेत्र गाभा क्षेत्रात समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या विस्तारीकरणाचा प्रस्ताव राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडे सादर करण्यात येणार असून, या प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर कारवा गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार आहे. यासाठी ७० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, अशी माहिती ही बैठकीत देण्यात आली.

**मुख्यमंत्र्यांच्या घोषणा**

मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी तसेच शेतपिकांचे नुकसान टाळण्यासाठी बफर क्षेत्रातील शेतकऱ्यांना वैयक्तिक सोलर कुंपण वितरणाचा निर्णय लवकरच करण्यात येईल. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत असलेली तीन कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी ताडोबा भवनाच्या बांधकामासाठी तीन वर्षांत १८ कोटी रुपये देणार आहोत. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील रानतळोधी, कोळसा या गावांच्या पुनर्वसनासाठी ६४ कोटी रुपयांची तरतूद आगामी आर्थिक वर्षात केली जाईल. चालू व येणाऱ्या आर्थिक वर्षात तरतूद करण्याच्या सूचना मुख्यमंत्री यांनी दिल्या.



# सह्याद्री देवराईला आग

बीड जिल्ह्यातील सह्याद्री–देवराई परिसरात अचानक आग लागून मोठ्या प्रमाणावर गवत जळाले असून, उन्हाळ्याचे दिवस सुरू झाल्याने वणवा पेटला, की कोणी खोडसाळपणा केला, याचा शोध घ्यावा लागणार आहे.

झाडे सुरक्षित असून, दोन एकर परिसरातील गवत जळाल्याची पुष्टी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. मिळालेल्या माहितीनुसार सह्याद्री–देवराई परिसराच्या माथ्यावर वन कर्मचारी पाणी देत होते. दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास परिसरातील गवताने पेट घेतल्याचे दिसून आल्यानंतर आग विझविण्यासाठी धावपळ सुरू झाली. एअर ब्लोअर मशीन, तसेच झुडपे व तुऱ्हाट्या आणून आगीवर नियंत्रणाचा प्रयत्न झाला. दीड तासांनंतर आग आटोक्यात आल्याचे वन कर्मचाऱ्यांनी सांगितले.

आगीचे कारण समजू शकले नाही. सह्याद्री–देवराई परिसरात आग लागल्याचे समजल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी घटनास्थळी पोहोचले. त्यांनी परिसराची पाहणी केली. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, वन अधिकारी तपास करीत असल्याचे सांगण्यात आले.



**सयाजी शिंदेंकडून विचारणा**

अभिनेता सयाजी शिंदे यांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंडे यांच्याशी संपर्क करून कशामुळे घटना घडली, झाडांचे नुकसान झाले का, याबाबत विचारणा केली. त्यावर खड्ड्यावर गवत नसल्याने झाडे सुरक्षित राहिल्याचे व दोन एकरातील गवत जळाल्याची माहिती मुंडे यांनी शिंदे यांना दिली.


सह्याद्री-देवराई परिसरात अचानक आग लागून ३२० झाडांना झळ लागली. क्षतीग्रस्त झाडांना तीन टँकरद्वारे पाणी देत परिसर पुन्हा फुलविण्याचे प्रयत्न वनविभागाने सुरू केले असून दोन ते तीन आठवड्यात झाडे पूर्ववत चांगली होतील, असा आशावाद वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

सह्याद्री-देवराई परिसरात आग लागून गवत पेटले होते. ही बाब वनकर्मचाऱ्यांच्या निदर्शनास येताच एअर ब्लोअर व अन्य पद्धतीने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. चार वर्षांत प्रथमच असा प्रकार घडल्याने सह्याद्री देवराईचे प्रमुख सयाजी शिंदे, अरविंद जगताप यांच्यासह पर्यावरणप्रेमींनी दुःख व्यक्त केले. आगीमुळे उजाड झालेला परिसर तसेच क्षतीग्रस्त झाडांना पुन्हा फुलविण्यासाठी वनविभागाने प्रयत्न सुरू केले आहेत. वन अधिकाऱ्यांनी केलेल्या निरीक्षणातून ३२० झाडांना झळ पोहोचल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार परिसर व क्षतीग्रस्त झाडांना पाणी दिले जात असल्याचे सांगण्यात आले.

■■■

सह्याद्री-देवराई परिसरातील क्षतीग्रस्त झाडे फुलविण्यासाठी वनविभाग शर्थीचे प्रयत्न करीत आहे. जवळच असलेला तलाव तसेच डोकेवाडा तलाव आणि परिसरातील खासगी विहिरींवरून तीन टँकरने आणलेले पाणी कर्मचाऱ्यांमार्फत सह्याद्री देवराईतील परिसर व झाडांना दिले जात आहे. लवकरच परिसर पूर्ववत होईल.

– **अमोल मुंडे,**
वनपरिक्षेत्र अधिकारी, बीड





# पर्यावरणस्नेही जीवनशैली हवी

वातावरणीय बदलाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर २०५० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे. महाराष्ट्रात जनजागृती, मूल्यांकन आणि कृती या त्रिसूत्रीच्या आधारे पर्यावरणपूरक शाश्वत विकास घडवून हे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केला. माझी वसुंधरा मोहिमेतून पर्यावरणस्नेही जीवनशैलीकडे नागरिकांना वळवण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.



महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत निसर्गाच्या पंचतत्वावर आधारित माझी वसुंधरा हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत वातावरणीय बदलांच्या परिणामांवर अनुकुलन (adaptation) व उपशमन (Mitigation) उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्य शासनामार्फत करण्यात येत असलेल्या या कामाची दखल घेऊन या उपाययोजनांना साहाय्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची अग्रणी संस्था 'संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम' (UNEP) आणि 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग' यांच्यामधील सामंजस्य करारावर आज स्वाक्षरी करण्यात आली. पर्यावरण व वातावरणीय विभागामार्फत प्रधान सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी तर संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यांच्यामार्फत प्रादेशिक संचालक आणि प्रतिनिधी डेचेन सेरिंग (Dechen Tsering) यांनी स्वाक्षरी केली. यावेळी ठाकरे बोलत होते.

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे ऑनलाईन स्वरूपात झालेल्या या कार्यक्रमात पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा पाटणकर म्हैसकर, UNEP चे भारतातील मुख्य अतुल बगाई, ब्रँड ॲम्बॅसिडर दिया मिर्झा, प्रादेशिक संचालक आणि प्रतिनिधी डेचेन सेरिंग, अर्थशास्त्र विभागाच्या संचालिका शिला अग्रवाल-खान, अफरोज खान व देश विदेशातील इतर मान्यवर उपस्थित होते.

ठाकरे म्हणाले, वातावरणीय बदल ही जागतिक समस्या असून, सर्वांनी एकत्र येऊन यावर

मात करणे गरजेचे आहे. सर्वांना विकास हवा आहे तथापि तो शाश्वत असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र हे देशाचे औद्योगिक आणि आर्थिक केंद्र आहे. महाराष्ट्राने इलेक्ट्रिक वाहन धोरण, माझी वसुंधरा अभियान, रेन वॉटर हार्वेस्टिंग, जंगल आणि कांदळवनांचे संरक्षण आदींच्या माध्यमातून यादृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. ‘इंटरगव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज’ चा अहवाल मंत्रिमंडळासमोर मांडून राज्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ‘महाराष्ट्र कौन्सिल फॉर क्लायमेट चेंज’ ची स्थापना करण्यात आली आहे. सार्वजनिक वाहतूक क्षेत्रात सर्व मोठ्या शहरांमध्ये इलेक्ट्रिक वाहन वापरण्यास सुरुवात झाली असून, मुंबईत बेस्ट मध्ये ३८६ इलेक्ट्रीक बसेस धावू लागल्या आहेत. राज्य केवळ इलेक्ट्रिक वाहनांवर थांबणार नसून, इतर वाहनांसाठी पर्यायी इंधनाचा विचारही केला जात आहे. समृद्धी महामार्गावर सुमारे २५० मेगावॅट स्वच्छ ऊर्जेची निर्मिती केली जाणार असून, सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रांमध्ये नागरिकांना चांगले जीवन जगता यावे यासाठी प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. या करारामुळे वातावरणीय बदलांशी लढण्यास आवश्यक बदल करता येतील तसेच प्रदूषणाबद्दल जागरूकता, अक्षय ऊर्जा स्त्रोत आणि संसाधनांच्या वापराबाबत प्रशिक्षणही शक्य होईल, असे ते म्हणाले.

यावेळी मनीषा म्हैसकर यांनी सादरीकरणाद्वारे महाराष्ट्रात केल्या जात असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. त्या म्हणाल्या, वातावरणीय बदल आपल्या दाराशी आला असून त्यावर आजच कृती करण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्रात यादृष्टीने विविध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. नागरिकांनी किमान एक पर्यावरण पूरक सवय अंगिकारावी यासाठी ई शपथ उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी माझी वसुंधरा अभ्यासक्रम तयार करण्यात आला असून, शालेय शिक्षण विभागामार्फत येत्या वर्षापासून तो राबविला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.




या सामंजस्य कराराअंतर्गत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना यूएनईपीच्या टाइड टर्नर चॅलेंजमध्ये सहभागी करून घेऊन त्यांना प्लास्टिक प्रदूषण आणि सागरी कचरा याबद्दल शिक्षित करण्यासाठी राज्याला मदत करेल. तसेच, प्रदूषण कमी करण्यासाठी आणि नैसर्गिक संसाधनांचा वापर, धोरणांचा विकास आणि अंमलबजावणी, प्रायोगिक प्रात्यक्षिके, प्रशिक्षण, क्षमता बांधणी आणि स्वच्छ आणि ऊर्जा कार्यक्षम नाविन्यपूर्ण उपायांचा अवलंब करण्यासाठी जागरूकता, सुव्यवस्थित आणि स्केलिंगसाठी मदत करेल. पर्यावरणीय शिक्षणाचा अजेंडा, इकोसिस्टिम पुनर्संचयित करण्यासाठी पुढाकार, प्लास्टिकच्या वापरामध्ये कपात, वातावरणीय बदल शिखर परिषद आणि इतर वेबिनार इत्यादी महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भागीदारी करणे हे या सामंजस्य कराराअंतर्गत करण्यात येणार आहे.

■■■

# ठाणे खाडीला रामसर स्थळाचा दर्जा

ठाणे खाडी क्षेत्राला 'रामसर' स्थळाचा दर्जा मिळावा यासाठी राज्याच्या कांदळवन कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मान्यता दिली असून, हा प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात येत आहे. रामसर दर्जा मिळाल्यास पक्षी निरीक्षणासाठी देश विदेशातून पर्यटक आकर्षित होतील तसेच पर्यावरण व पर्यटन वाढीस चालना मिळून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. यासोबत पाणथळ जागेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचून त्याच्या संरक्षणास आणि संवर्धनास अधिक गती मिळताना जागतिक पर्यटन नकाशावरदेखील याची नोंद होईल असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ९ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या राज्य पाणथळ प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीत यास मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर हा प्रस्ताव





मुख्यमंत्र्यांकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य १६.९०५ चौ.कि.मी क्षेत्रावर पसलेले आहे. आंतरराष्ट्रीयदृष्ट्या पर्यावरणाबाबत महत्त्व असलेल्या क्षेत्रांना रामसर क्षेत्र असे म्हटले जाते. ठाणे खाडी परिसरात परदेशातून भारतात स्थलांतर करणाऱ्या फ्लेमिंगो पक्ष्यांसह इतर काही पक्षी–प्रजाती आढळतात. त्यामुळे या पाणथळ जागेला आंतरराष्ट्रीयदृष्ट्या विशेष महत्त्व आहे. ठाणे खाडीच्या अंदाजे ६५ चौरस किलोमीटरचे क्षेत्र रामसर स्थळ म्हणून प्रस्तावित असून, त्यात १७ चौरस किलोमीटरमध्ये अभयारण्याचे क्षेत्र आहे. उर्वरित ४८ चौरस किलोमीटर ही जागा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून ऑक्टोबर २०२१ मध्ये अधिसूचित झाली आहे. त्यामुळे या परिसरातील जैवविविधता जपणे सुलभ होणार आहे.ठाणे खाडी परिसर रामसर क्षेत्र म्हणून घोषित झाल्यानंतर फ्लेमिंगोसह विविध पक्षी व प्रजातींचे अधिक संवर्धन होण्यास मदत मिळेल.

**महाराष्ट्रातील रामसर स्थळे**

पाणथळांसाठीच्या आंतरराष्ट्रीय रामसर अधिवेशनात नाशिक जिल्ह्यातील 'नांदूर मधमेश्वर' अभयारण्यास जानेवारी २०२० मध्ये रामसर स्थळाचा दर्जा दिला गेला. हे महाराष्ट्रातील पहिले रामसर स्थळ आहे. नोव्हेंबर २०२० मध्ये घोषित झालेले बुलडाण्यातील 'लोणार सरोवर' हे महाराष्ट्रातील दुसरे रामसर स्थळ आहे. यानंतर ठाणे खाडीला रामसर स्थळाचा दर्जा मिळाल्यास महाराष्ट्रातील हे तिसरे रामसर स्थळ होईल.

**रामसर दर्जा म्हणजे काय ?**

१९७१ मध्ये इराणमधील रामसर शहरात 'रामसर परिषद' झाली. या परिषदेत जगातील महत्त्वपूर्ण पाणथळ जागांचे संवर्धन आणि त्यांच्या पर्यावरणपूरक वापराचे निर्णय घेण्यात आले. त्यासाठीचा कृती आराखडाही तयार करण्यात आला. या आराखड्यानुसार प्रत्येक सहभागी राष्ट्राने आपल्या देशातील जागतिकदृष्टीने महत्वपूर्ण पाणथळ जागा शोधून त्यांना 'रामसर स्थळ' घोषित करण्याचे निश्चित करण्यात आले. पाणथळ जागेच्या कक्षेत सरोवरे, नद्या, तलाव, दलदल, गवताळ पाणथळ मैदाने, खाड्या, समुद्र किनारे, भातखाचरे, इ. जागांचा समावेश करण्यात आला.

**जगात २४२४ पाणथळांना रामसर स्थळे**

भारताने 'रामसर' करारावर १९८२ मध्ये स्वाक्षरी करून पाणथळींच्या संवर्धनाकरिता पाऊल उचलले. सध्या जगातील २४२४ पाणथळांना 'रामसर' स्थळाचा दर्जा प्राप्त आहे. यात भारतातील ४९ स्थळांना 'रामसर स्थळा' चा दर्जा मिळाला आहे.

केंद्र सरकारच्या जल जीवन मिशनअंतर्गत २०२४ पर्यंत प्रत्येक घरी नळाने पाणी पुरवठा केला जाईल, असे म्हटले जाते. तथापि, देशात आतापर्यंत फक्त ४६ टक्के ग्रामीण लोकसंख्येपर्यंतच असे पाणी पोहोचले आहे.

महाराष्ट्रात ६७ टक्क्यांपेक्षा जास्त ग्रामीण कुटुंबांपर्यंत पाणी पोहोचले आहे. केंद्र सरकारचे म्हणणे असे की, राज्य सरकार त्यांना दिल्या गेलेल्या निधीतील फक्त १० टक्के रक्कमच वापर करीत आहे. उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि झारखंडमध्ये सर्वाधिक लोकसंख्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे.

जल शक्ती राज्यमंत्री प्रल्हाद पटेल यांनी लोकसभेत दिलेल्या उत्तरानुसार उत्तर प्रदेशमध्ये १३.३ टक्के, छत्तीसगडमध्ये १६.८ टक्के आणि झारखंडमध्ये फक्त १८.२ टक्के ग्रामीण कुटुंबांपर्यंत पाणी पोहोचले आहे.

एका प्रश्नाच्या उत्तरात लोकसभेत पटेल म्हणाले की, जल जीवन मिशन राज्यांच्या भागीदारीने लागू केले गेले आहे. योजनेअंतर्गत महाराष्ट्राला गेल्या तीन वर्षांत एकूण ९,७४१.३ कोटी रुपये दिले गेले. त्यातील फक्त ९८९.४६ कोटी रुपये वापरले गेले. राज्य सरकारने राज्याच्या वाट्याअंतर्गतही १,०२० कोटी रुपये खर्च केले.

भाजपचे सुधाकर श्रृंगारे यांच्या प्रश्नावर पटेल यांनी १५ ऑगस्ट, २०१९ पर्यंत महाराष्ट्रात १४२.३६ लाख ग्रामीण कुटुंबे होती. त्यातील ४८.४४ लाख कुटुंबांना पिण्याच्या पाण्याची जोडणी दिली गेली आहे, असे सांगितले. यानंतर राज्यात ग्रामीण कुटुंबांची संख्या वाढून १४६.०९ लाख झाली आणि ५०.२६ लाख अतिरिक्त कुटुंबांना पाण्याची जोडणी दिली गेली. या प्रकारे राज्यात एकूण ९८.७ लाख कुटुंबांना पाण्याची जोडणी दिली गेली आहे. ही टक्केवारी ६७.५६ टक्के आहे.

# ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य



■■■

# डोंबिवलीतील धोकादायक कारखाने

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक, धोकादायक, अतिधोकादायक असे १५६ कारखाने स्थलांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय़ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

मागील वर्षी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी डोंबिवली औद्योगिक वसाहतीस भेट दिल्यानंतर येथील घातक उद्योगांचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व उद्योग विभागाने केलेल्या पाहणीनुसार १५६ कारखाने रासायनिक, धोकादायक, अतिधोकादायक असल्याचे निदर्शनास आले. या ठिकाणी वारंवार होणारे अपघात तसेच प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आल्यानंतर येथील कारखाने इतरत्र हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार डोंबिवलीतील १५६ धोकादायक कारखाने पाताळगंगा एमआयडीसी परिसरात हलविण्यात येणार आहेत.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रामध्ये ५२५ औद्योगिक भूखंड आहेत. तर ६१७ निवासी भूखंड आहेत. रासायनिक कारखान्यांमध्ये होणारे संभाव्य अपघात टाळण्याच्या दृष्टीने रहिवासी भागांपासून ५० मीटर अंतरावर असलेले धोकादायक कारखाने स्थलांतरित केले जाणार आहेत. डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील सध्याच्या धोकादायक कारखान्यांना उत्पादनात बदल करून व्यापारी, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञानसंबंधी उत्पादने तयार करण्यास परवानी दिली जाणार आहे. डोंबिवलीतील कारखान्यांना पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील प्रचलित दराने भूखंड उपलब्ध करून दिले जातील. कारखाने स्थलांतरित होत असताना कामगार, पर्यावरण आदींबाबत योग्य निर्णय़ संबंधित विभाग घेतील.



**इव्ही चार्जिंग स्टेशनसाठी प्राधान्याने भूखंड**

विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी एमआयडीसीकडून प्राधान्याने भूखंड उपलब्ध करून दिले जाणार आहेत. दुचाकी तसेच चारचाकी इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी भूखंड उपयुक्त ठरेल. राज्य शासनाने अलीकडेच घोषित केलेल्या ईव्ही धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा निर्धार एमआयडीसीने केला आहे.

# कृषी पंपाची संजीवनी

**सुरेश पाटील**

माहिती अधिकारी,
उप माहिती कार्यालय, शिर्डी.

घरची वडिलोपार्जित १५ एकर जमीन पाण्याची चोवीस तास मुबलकता, मात्र वीजेच्या अनियमितेमुळे शेती करणे कष्टप्रद अशातच शासनाच्या मुख्यमंत्री सौर पंप योजनेचा लाभ मिळाला आणि ऊस शेतीला संजीवनी मिळाली असून ऊसाच्या फडात बसविलेल्या सौर संचामुळे १२ एकर शेती बहरून आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोतुळ येथील पदवीधारक तरूण शेतकरी शुभम उपासनी याने ऑक्टोबर २०२० मध्ये वडिलांच्या नावावर शासनाच्या मुख्यमंत्री सौर पंप योजनेत अर्ज केला. या योजनेत त्यांची निवड होऊन त्यांच्या शेतात ऑक्टोबर २०२१ मध्ये साडेसात अश्व शक्तीचा कृषी सोलर वॉटर पंप बसविण्यात आला. सोलर पंप बसण्यापूर्वी ऊस शेती करतांना कसरत करावी लागत होती. वीजेच्या अनियमितेमुळे ऊसाला पाणी देतांना तारांबळ होत होती. कधी कधी तांत्रिक कारणांमुळे आठ-दहा दिवस विद्युतपुरवठा खंडित झाल्याने मोठे नुकसान व्हायचे. आता मात्र १२ एकर ऊस शेताला सोलर पंपाद्वारे पाणी देणे सोयीचे, सहज साध्य होत आहे. त्यामुळे ऊसाची शेती करणे फायद्याचे ठरत आहे. असे शुभम उपासनी यांनी सांगितले.

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेत खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर सोलर पंप दिला जातो. या पंपाची खुल्या बाजारात साधारणतः चार ते साडेचार लाख रूपये किंमत आहे. शुभम उपासनी याने यासाठी १० टक्के रक्कमेचा भरणा केला. त्यातून त्यांना सोलर (सौर) संच मिळाला. शक्ती सोलर कंपनीच्या ह्या संचाला साडेसात





अश्वशक्तीचा पंप जोडण्यात आला. सध्या सकाळी साडेआठ ते संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विनाअडथळा हा पंप सुरू आहे. सध्या दिवसाला दीड एकर ऊसाच्या क्षेत्रात सिंचन होते. सोलर पंप संच मिळवून देण्यासाठी शुभमला महावितरणचे सहायक अभियंता श्रीकांत सोनवणे, विठ्ठल हारक, बाळू घोडे, संजय गवारी , सचिन पाटील यांची मदत झाली.

शुभम स्वत: उच्च विद्याविभूषित आहे. बी.टेक (फूड टेक्नोलॉजी) केल्यानंतर त्यांने एम.बी.ए (मॉर्केटिंग) केले आहे. वडील सतीश उपासनी खासगी अनुदानित संस्थेत लिपिक आहेत. घरी आजोबा, आई, बहिण व पत्नी असा परिवार आहे. घरातील एकुलता एक मुलगा असल्यामुळे संपूर्ण शेतीची जबाबदारी शुभम वर आहे. शेतीच्या कामात वडील व आजोबांचे त्याला नेहमी मार्गदर्शन होत आहे व परिवाराची मदत होते.

शेतीसोबत शेतीपूरक व्यवसाय म्हणून गायींचा गोठाही शुभमने उभा केला आहे. सध्या त्याच्याकडे डांगी, जर्सी व गीर गायी आहेत. यातून दूग्ध उत्पादनासोबतच शेणखत उपलब्ध होते. या शेणखताच्या माध्यमातून सेंद्रीय पध्दतीने शेती करणं शक्य होतं आहे. भविष्यात पॉली हाऊसच्या माध्यमातून पीक उत्पादन घेण्यावर भर देणार आहे. तसेच सूक्ष्म सिंचन, सेंद्रीय खत व कमीत कमी मनुष्यबळाचा वापर करत आधुनिक पध्दतीने शेती केली तर शेती निश्चितच फायदेशीर ठरेल.असेही शुभम उपासनी यांने सांगितले.

■■■





# खारफुटी जंगल संवर्धनाचे कौतुक

खारफुटीजंगलांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या महत्त्वपूर्ण उपाययोजनांचे केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे यांनी संसदेत कौतुक केले.

केंद्रशासनाकडून देशातील जंगल संवर्धन व संरक्षणासाठी होत असलेल्या कार्याची माहिती चौबे यांनी राज्यसभेत दिली, त्यावेळी महाराष्ट्र शासनाच्या खारफुटी जंगल संवर्धनाच्या कार्याचे विशेष कौतुकही त्यांनी केले. महाराष्ट्र सरकारने खारफुटीच्या संवर्धनासाठी अनेक सक्रिय पावले उचलली आहेत. खारफुटी संवर्धनासाठी राज्याने 'समर्पित खारफुटी विभागा'ची स्थापना केली आहे.'कांदळवन आणि सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठान' स्थापन करून राज्यात खारफुटीचे आच्छादन वाढविण्याचे तसेच, वन विभागांतर्गत संशोधन व उपजीविका उपक्रमांना चालना देण्याचे कार्य होत असल्याचेही चौबे यांनी सांगितले.

'खारफुटी आणि प्रवाळ खडक संवर्धन व व्यवस्थापन' या राष्ट्रीय किनारी अभियान कार्यक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत योजनेद्वारे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या कार्यक्रमांतर्गत वार्षिक व्यवस्थापन कृती आराखडा तयार करण्यात येतो आणि सर्व किनारी राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचेही चौबे यांनी सांगितले.

'वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर इंडिया'च्या माहिती नुसार, या संस्थेद्वारे 'मॅजिकल मॅंग्रोव्हज' मोहिमेच्यामाध्यमातून खारफुटी संवर्धन विषयक साक्षरतेसाठी महाराष्ट्रासह देशातील नऊ राज्यांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही चौबे म्हणाले.

■■■

# शाश्वत कृषी पर्यटन

**मीरा ज्ञानदेव ढास**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद

सध्याच्या कोरोना व इतर विषाणू संसर्गाच्या काळात जगभरात कृषी आणि ग्रामीण पर्यटनाला मोठी चालना मिळाली असून, कृषी पर्यटनातूनच पर्यावरण सुलभ आणि शाश्वत पर्यटन साध्य केले जात आहे. वाढते नागरिकीकरण, कोरोनासारख्या आजारातून वाढत जाणारा मानसिक ताणतणाव या पार्श्वभूमीवर कृषी आणि ग्रामीण पर्यटनाला येत्या काळात मोठी संधी असणार आहे. स्वच्छ मोकळे वातावरण, ग्रामीण– जीवन अनुभव, विविध परंपरा, सण–उत्सव, खाद्यपदार्थ याबरोबरच 'हुरडा पार्टी' यासारख्या नवीन एकदिवसीय पर्यटन आणि ग्रामीण अनुभव देणारी संकल्पना मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होताना दिसते. मराठवाड्यात उद्योग व पर्यटना बरोबरच कृषी पर्यटन हा व्यवसाय नव्याने उभारी घेत आहे. वेगळेपण असलेल्या मराठवाडा विभागात जागतिक वारसा स्थळे व पर्यटन केंद्र, लेण्या, किल्ले, वास्तू आहेत, देशात कृषी पर्यटन चळवळ सुरु करणारे 'महाराष्ट्र हे पहिले राज्य' आहे. महाराष्ट्र शासनाचा पर्यटन व कृषी विभाग पर्यटन विषयातील माहितीचा व ज्ञानाचा उपयोग करुन महिला शेतकऱ्यांना कृषी पर्यटनाच्या क्षेत्रात चालना देण्यासाठी कृषी विभागाच्या योजनांचा लाभ प्राधान्याने राबवित आहे.

कृषी पर्यटन ही एक उभारी देणारी संकल्पना असून, कृषी पर्यटनामुळे अर्थकारणावर सकारात्मक परिणाम होत आहे. शेती आणि पर्यटनाच्या संगमातून केवळ रोजगार संधीच निर्माण होत नाहीत तर ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासाला चालना मिळते कृषी पर्यटनाला चालना देताना या क्षेत्रातील घटकांचे, विशेषत: महिलांच्या कौशल्य विकास, प्रशिक्षण करण्यावर भर देण्याचे शासनाचे धोरण आहे. येत्या काळात कृषी पर्यटनाला चालना देण्याचा निर्धार २०२१ च्या चौदाव्या जागतिक कृषी पर्यटन दिनानिमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये करण्यात आला असून, तो कृषी पर्यटनाला नक्कीच उभारी देणारा ठरणार आहे.

पर्यटन व्यवसायामध्ये रोजगार निर्मितीसह देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण भर टाकण्याची





क्षमता असल्याने त्या अनुषंगाने राज्यात पर्यटनाच्या विविध क्षेत्रांना चालना देण्यात येत आहे. कृषी पर्यटन धोरण जाहीर केल्यानंतर राज्यात काही कृषी पर्यटन केंद्रांना नोंदणी प्रमाणपत्रेही देण्यात आली आहेत. यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळण्याबरोबरच इतर शेतकऱ्यांना रोजगाराची प्रेरणा मिळाली. मराठवाडा विभागात आठ जिल्ह्यांत एकूण २८ कृषी पर्यटन केंद्र आहेत. औरंगाबाद जिल्ह्यात एकूण १४ कृषी पर्यटन केंद्र असून, यातील आठ पर्यटन केंद्रांना नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाली आहेत. प्रामुख्याने सृष्टी कृषी पर्यटन केंद्र मिर्झापूर नगर रोड औरंगाबाद, चैतन्य कृषी पर्यटन केंद्र, वृक्षमित्र कृषी पर्यटन केंद्र वडगाव जाधव, याचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. कृषी पर्यटनाच्या विकासासाठी यापुढील काळातही व्यापक उपाययोजना राबविण्यात येत असून, शेतीचा जोडव्यवसाय म्हणून कृषी पर्यटन विकसित होत आहे.

कृषी पर्यटन धोरणाने महाराष्ट्रात कृषी पर्यटन विकसित व्हावे यासाठी होतकरू शेतकऱ्यांना उत्तम मार्ग दाखवला असून, धोरण राबवल्यापासून संबंधित शेतकऱ्यांना आपल्या रोजगारात २५ टक्के वाढ झाल्याचे अनुभवले. पुणे, रायगड, सातारा, औरंगाबाद अशा अनेक जिल्ह्यांमध्ये कृषी पर्यटन केंद्रांमुळे केवळ शेतकऱ्यांच्या जीवनावर नव्हे तर संपूर्ण गावाच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत बदल झालेला आहे.

राज्यातील दहा जिल्ह्यांमध्ये पर्यटन–विकासासाठी प्रायोगिक तत्वावर 'जिल्हा पर्यटन अधिकारी' नेमण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच पर्यटनविकासासाठी खासगी संस्थांच्या सहभागासाठी जिल्ह्यात पर्यटन सोसायटी स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. राज्यात कृषी विभागाच्या ३० टक्के योजना या महिला शेतकऱ्यांसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्याने कृषी पर्यटन धोरण जाहीर करुन राज्याने या क्षेत्रात आघाडी घेतली. आपला देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो, त्यामुळे कृषी पर्यटनाला देशात व राज्यात मोठा संधी आहे. इटली, स्पेनसह विविध युरोपीयन देश, अमेरिका आदी ठिकाणी कृषी पर्यटनात विविध प्रयोग केले जात आहेत. गावाचे गावपण, संस्कृती, विचार परंपरा, उत्सव, खाद्यपदार्थ हे ग्रामीण पर्यटनाचे घटक बनले असून निःस्वार्थी शेतकरी स्थायीभाव, आदरातिथ्याची जोड, शिक्षण व तंत्रज्ञानाची साथ, यामुळे महिलांचा सहभाग ग्रामीण पर्यटनाला मोठा वाव आहे. कोरोनोत्तर काळात या क्षेत्राला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात अली आहे. यामुळे कृषी पर्यटन हे पर्यटन विकासात शाश्वत योगदान देणारे पर्यटन म्हणून पर्यटकांच्या पसंतीस उतरले आहे.

■■■

डॉ. सलीम अली पक्षी अभयारण्य परिसरातील महसूल विभागाकडील क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून, पक्ष्यांना सुरक्षित अधिवास मिळण्याच्यादृष्टीने प्रयत्न करावे, असे प्रतिपादन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी केले.

येरवडा येथील सलीम अली पक्षी अभयारण्य भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार सुनील टिंगरे, माजी मंत्री सचिन अहिर, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, मनपा आयुक्त विक्रम कुमार, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, उपवनसंरक्षक राहुल पाटील, अतिरिक्त मनपा आयुक्त राहुल खेमणार आदी उपस्थित होते.

ठाकरे म्हणाले, शासन गेल्या दोन वर्षांपासून वन वाचविण्यासाठी मोठ्याप्रमाणात प्रयत्न करीत आहेत. पक्षी आणि वन्यजीवांना सुरक्षित अधिवास मिळणे गरजेचे आहे. पक्षी अभयारण्य परिसरात अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असून, संरक्षणाच्यादृष्टीने परिसरात पोलिसाची गस्त वाढविण्याच्या सूचना पोलीस आयुक्तांना दिल्या आहेत. तसेच गैरप्रकार होऊ नये म्हणून सीसीटीव्ही बसविण्याचा सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अभयारण्य परिसरात पुणे महानगर–पालिकेने स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम राबवावी. नागरिकांनी या पक्षी अभयारण्याला भेट द्यावी आणि पर्यावरणाच्यादृष्टीने पुण्यातील हिरवे आच्छादन टिकवण्यासाठी झाडाची लागवड करावी, असे आवाहन ठाकरे यांनी केले.

पुण्यातील नागरिक पर्यावरणाप्रती जागरुक असून त्यांच्या सहकार्याने पुण्याला २०३० पर्यंत कार्बन न्यूट्रल करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही ते म्हणाले.


मनपा आयुक्त विक्रम कुमार यांनी अभयारण्य परिसरात होत असलेल्या कामांची माहिती दिली.

# सलीम अली अभयारण्याचा विकास



# कोकण विकासाची गुरुकिल्ली


राज्यावर आलेले कोरोनाचे संकट जगभर पसरले आणि याचा सर्वात जास्त परिणाम पर्यटन क्षेत्रावर झाला. पर्यटन पूर्ववत आता व्यवसाय करण्यासाठी शासनस्तरावर विविध उपाययोजना करून पर्यटनाला चालना देण्यात येत आहे. गोवा राज्यातील किंवा जगभरातील किनारे शॅकमुळे प्रसिद्ध आहेत. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्रकिनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे. पर्यटनातून रोजगारनिर्मिती आणि त्यातून विकास हीच कोकणच्या विकासाची गुरुकिल्ली आहे.



**कु. आदिती तटकरे,**
पर्यटन राज्यमंत्री

या स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी सातत्य ठेवण्यात आपण सर्वच गुंतलेलो आहोत. क्षेत्र कुठलेही असो, शारीरिक व मानसिकदृष्ट्या आपण स्वतःला तयार ठेवतो . यामध्ये सातत्य व समतोल राखण्यासाठी एखादा छंद, विरंगुळा, खेळ व पर्यटन हे पर्याय आपल्या समोर असतात. कोरोना काळात पर्यटन थांबले असले तरी राज्याच्या पर्यटन विभागाने या कठीण काळातही पर्यटनास विविध पैलू देणारे निर्णय व सामंजस्य करार केले आहेत. ताडोबातील वाघ, कोकणातील विविध समुद्रकिनारे, वनसंपदा, गडकिल्ले हे राज्याचे भांडवल आहेच. नव्या पिढीसह ज्येष्ठ पर्यटकांना पर्वणी ठरेल असे काही निर्णय राज्याच्या पर्यटन विभागाने गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत घेतले आहेत. ज्यामध्ये आदरातिथ्य व्यवसायास उद्योगाचा दर्जा देऊन अधिक हॉटेल व्यावसायिक पर्यटनाशी थेट जोडण्याचा प्रयत्न आहे. लोकप्रिय असे लोणार सरोवर, अजिंठा वेरुळ लेणी, माथेरान व महाबळेश्वर या प्रचलित पर्यटनाच्या स्थळांना अधिक सोई–सुविधांसाठी–जंजिरा किल्ला वाढीव निधी महत्त्वाच्या पर्यटन स्थळांचे पर्यटन दर्जात श्रेणीवर्धन ज्यामध्ये अलिबाग, श्रीवर्धन व मुरुड–जंजिरा या रायगड जिल्ह्यातील स्थळांचा समावेश आहे. तीर्थक्षेत्र म्हणून भाविकांमध्ये प्रसिद्ध असे अष्टविनायक गणपती या संपूर्ण परिमंडळाचा विकास साधण्यासाठी पर्यटन, ग्रामविकास विभाग एकत्रितपणे प्रयत्नशील आहेत. कॅलिफोर्नियाला कोकणाचे उदाहरण द्यावे अशा दिशेने वाटचाल करताना चिपी विमानतळ लवकरच पर्यटकांच्या सेवेत उतरणार आहे . राज्यातील पर्यटन क्षेत्राच्या एकूण विकासासाठी राज्य शासन विविध योजना राबवत असून, त्यातून महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती येणार आहे. विशेषतः कोकण किनारपट्टी ही पर्यटनवाढीसाठी सर्वात महत्त्वाची असून, त्यादृष्टीने राज्य शासनाने विविध उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. कोकण पर्यटनाला चालना देण्यासाठी बीच शॅक धोरण राबवून समुद्र किनाऱ्यांचा क्षमतेनुसार विकास करण्यात येत आहे. यामध्ये सिंधुदुर्ग, रत्नागिरी रायगड आणि पालघर या जिल्ह्यांचा समावेश आहे रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली, रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर

जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या आठ किनाऱ्यांवर बीच रॉक्स उभारण्यात येणार आहेत. प्रत्येकी दहा शॅक उभारून हा पायलट प्रोजेक्ट करण्यात येत आहे. यात ८० टक्के रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्यात येत आहे. हा प्रकल्प पर्यावरणपूरक असून परिसरातील, किनाऱ्यावरील स्वच्छता व सौंदर्य राखून पर्यटकांना सुविधा व स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. भविष्यामध्ये इतर समुद्रकिनाऱ्यांवर देखील हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचा प्रयत्न असेल. विविध पर्यटनस्थळांचा विकास कोकण पर्यटनाबरोबरच राज्यातील पर्यटन विकास करण्यासाठी विविध प्रयत्न सुरू आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी ताज ग्रुपच्या इंडियन हॉटेल्स कंपनीला ५४.४० हेक्टर जमीन ९ वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे. तसेच रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड-जंजिरा आणि श्रीवर्धन या पर्यटनस्थळांना 'ब' वर्ग पर्यटनस्थळांचा दर्जा देण्यात आला आहे. भारताच्या अनेक राज्यांच्या अर्थव्यवस्था पर्यटनावर उभारलेल्या आहेत. कोकणात ७२० कि.मी.चा विस्तीर्ण समुद्रकिनारा, सह्याद्री पर्वतरांगा, जंगले, जैवविविधता, नद्या, धबधबे, तलाव, प्राचीन वास्तु, तीर्थक्षेत्रे, किल्ले. थंड हवेची ठिकाणे आदी नैसर्गिक संपत्ती उपलब्ध असूनही पर्यटन क्षेत्रातला आपला वाटा तसा पाहिला तर कमी आहे. पर्यटन हा जगात सर्वाधिक रोजगार आणि परकीय चलन मिळवून देणारा उद्योग आहे. स्थानिकांना संधी महाराष्ट्रात पर्यटनावर आधारीत विविध उद्योगधंदे पर्यटनस्थळी व तीर्थक्षेत्रस्थळी विकसित होत आहेत. निसर्गरम्य कोकणात येणाऱ्या पर्यटकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून पर्यटनस्थळी तज्ज्ञ पर्यटक मार्गदर्शक (गाईड) हा उत्तम पर्याय विकसित होत आहे. स्थानिक पातळीवरील मार्गदर्शन विषयक ज्ञान, कौशल्य आत्मसात करून त्याच्या साहाय्याने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटन व्यवसाय व रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यासाठीचे कौशल्य आत्मसात करण्याची संधी या उपक्रमाच्या माध्यमातून पर्यटन विभाग स्थानिकांना देत आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन रायगड जिल्ह्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य व फणसाड अभयारण्य या ठिकाणी पर्यटक पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमी यांची कायम पसंती असते. शालेय विद्यार्थ्यांच्या सहली, अभ्यास दौरे या दोन्ही पर्यटनस्थळी होत असतात. येथे येणाऱ्या पर्यटकांना अभयारण्यातील महत्त्वाच्या स्थळांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन मिळावे, पर्यटन मार्गदर्शक म्हणून स्थानिक आदिवासी तरुण तरुणींना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावा, अशी संकल्पना आहे. त्यानुसार भारत सरकारचा ऑनलाईन पर्यटन सुलभ मार्गदर्शक हा अभ्यासक्रम महाराष्ट्रातील बेरोजगार युवकांसाठी अधिकृतरीत्या महाराष्ट्र शासनाने प्रमाणित करून सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हे प्रशिक्षण वर्ग पर्यटन संचालनालयामार्फत आयोजित करण्यात आले होते. रायगड जिल्हा हा भौगोलिक, नैसर्गिक,



मुरुड-जंजिरा किल्ला



माथेरान

औद्योगिकदृष्ट्या खूप संपन्न आहे. येथील समुद्रकिनारे किल्ले रायगड, जंजिरा, अभयारण्य, प्राचीन लेणी पाली महड सारखी तीर्थक्षेत्रे, माथेरानसारखे हिलस्टेशन, घारापूरची लेणी आणि विविध पर्यटन स्थळे यांचा सर्वांगीण विकास करून येथे येणाऱ्या पर्यटकांना राहण्याच्या योग्य, स्वच्छ सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न आहे. पर्यटकांना जिल्ह्यात आल्यावर ४ ते ५ दिवस राहता फिरता यावे या दृष्टीने 'टूरिस्टर हब' या जिल्ह्यात व्हावा यासाठी पर्यटन विभाग व स्थानिक प्रशासन मिळून प्रयत्न करत आहोत. खारघर येथे एम.टी.डी.सी. रेसिडेन्सी सुरू करण्यात आले आहे. माथेरान समुद्रकिनारी आलेले पर्यटक आजुबाजूला असलेल्या अनेक स्थळांना भेट देतील व वास्तव्य करतील या दिशेने विकास करून रायगड जिल्हा पर्यटन पॅकेज' म्हणून येणाऱ्या काही काळात पर्यटकांना देण्याचा आमचा प्रयास आहे. कुडा लेण्या विकास, एलिफंटा लेण्यांचा विकास, मुरूड–जंजिरा इ. विकास करण्यासाठी एएसआयकडून परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कर्नाळा, फणसाड या अभयारण्यात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यास लाभलेले वैविध्यपूर्ण निसर्ग सौंदर्य, अद्वितीय ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा यामुळे या जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांचा ओघ जास्त आहे. फणसाड व कर्नाळा पक्षी अभयारण्य इथे येणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला एक समृद्ध आणि सुंदर अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भटकंती, प्रवास हा फक्त म्हणून न जोपासता त्याला शैक्षणिक आणि व्यावसायिक जोड देण्याचा विचार करून छंद राज्यातील इच्छुक युवक–युवतीसाठी पर्यटक मार्गदर्शक प्रशिक्षण ही संकल्पना सुरू करण्यात आली आहे. आपण कोकणचा कॅलिफोर्निया करण्याबाबत नेहमी बोलत असतो. पण कोकणचा पर्यटनासह इतर सर्व क्षेत्रात सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला आहे. त्यामुळे कॅलिफोर्नियाने कोकणासारखे व्हावे, असे बोलले पाहिजे. किल्ले व ऐतिहासिक वास्तुंचे संवर्धन व संरक्षणाची दिर्घकालीन व्यवस्था करून त्यांचे महत्त्व पर्यटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभावी यंत्रणा विविध योजनांच्या माध्यमातून राबवली जात आहे. कोकणातील सुंदर सागरी किनारे, हिरवीगार पालवी, जगप्रसिद्ध वारली कला आणि सागरी किल्ले याकडे पर्यटक सतत आकर्षित होतात. कोकणातील प्रत्येक ग्रामस्थाने कोकण पर्यटनाचे मार्केटिंग केले पाहिजे. जगभरात पर्यटन व्यवसायाला मोठी संधी आहे. काही राष्ट्रे तर फक्त पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहेत इतकी या क्षेत्राची ताकद आहे. गोवा राज्याचे अर्थकारण मुख्यतः पर्यटनावर आधारलेले आहे. कोकण विकासाला चालना देशाच्या भौगोलिक रचनेमुळेच आपण उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीन ऋतु अनुभवणाऱ्या जगातील मोजक्याच राष्ट्रांमध्ये येतो. निसर्ग रचनेचे काम करणाऱ्या युनेस्कोसारख्या संस्थांनी कोकणातील वनांना जागतिक संरक्षित वनांचा दर्जा दिला आहे. येथील काही प्राण्यांच्या प्रजाती काही वनस्पतींची जैविकता पृथ्वीतलावर फक्त येथेच पाहावयास मिळते. निसर्ग अबाधित राखून जर विकासाचा चतुःसूत्री आराखडा जर कार्यान्वित केला तर पर्यटनाच्या माध्यमातून कोकणच्या विकासाला सर्वांगीण चालना मिळेल आणि पर्यटनाच्या उद्योगातून कोकण अर्थकारणाचा एक चांगला पर्याय महाराष्ट्राच्या आर्थिक सुबत्तेला उपलब्ध होईल आणि कोकण विकासाची गुरुकिल्ली ठरल्याशिवाय राहणार नाही.

**शब्दांकन – काशिबाई थोरात,**
विभागीय संपर्क अधिकारी

■■■




# इरई नदीचे खोलीकरण

इरई नदी ही चंद्रपूर शहरालगत असून सरासरी सात किलोमीटर ती शहराला समांतर वाहते. नदीचे पात्र रुंद झाल्यामुळे पावसाळ्यात अनेकदा पूर परिस्थिती निर्माण होते. ही बाब जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार यांनी निदर्शनास आणून दिली आहे. प्रशासनाने पहिल्या टप्प्यात तत्काळ उपाययोजना म्हणून नदीच्या खोलीकरणाचे काम सुरू करावे, अशा सूचना वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.

चंद्रपूर जिल्ह्यातील इरई नदी व वढा तीर्थक्षेत्राच्या विकासासंदर्भात मुंबई येथे आढावा बैठक झाली. यावेळी मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार, आमदार किशोर जोरगेवार उपस्थित होते.

इरई नदीचे खोलीकरण, सौंदर्यीकरण व संवर्धन करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार हे सतत पाठपुरावा करीत आहेत. शासनही यासाठी सकारात्मक आहे. पहिल्या टप्प्यात नदीचे पात्र मोकळे केले तर पाणी कुठे थांबते, कुठून निघून जाते, पूर परिस्थिती कशामुळे निर्माण होते, या बाबींचा अंदाज येईल. त्यामुळे नदीचा गाळ काढून खोलीकरण करणे आवश्यक आहे. या कामाकरिता विदर्भ सिंचन महामंडळाकडील मशीन उपलब्ध करून दिल्या जातील. जिल्हा नियोजन समितीमधून डिझेलसाठी निधीची तरतूद करावी. जेणेकरून सदर मशीनद्वारे कामाला तात्काळ सुरवात होईल. पुढील वर्षी इरई नदीच्या संवर्धनासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही उपमुख्यमंत्री म्हणाले.

इरई नदी ही शहरातून वाहत असून नदीचे पात्र रुंद झाल्यामुळे पुराचा धोका निर्माण होतो. त्यामुळे पहिल्या टप्प्यात नदीच्या पात्रातील झाडे–झुडपे, अतिक्रमण, गाळ काढणे आणि खोलीकरणासाठी तर दुसऱ्या टप्प्यात सुशोभीकरण, सौंदर्यीकरण, संवर्धन, बंधारे आणि विकासासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी पालकमंत्री विजय वडेट्टीवार यांनी केली. पुराच्या




प्रतिबंधासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाद्वारे पैसे देण्याची तरतूद आहे. ते त्वरित दिले जाईल. तर गॅबियन बंधाऱ्यासाठी जलसंपदा विभागाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

वढा तीर्थक्षेत्राच्या विकासाबाबत पालकमंत्री म्हणाले, वर्धा आणि पैनगंगा नदीच्या संगमावर असलेले वढा हे 'ब' दर्जाचे तीर्थक्षेत्र होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. ग्रीन बिल्डींग संकल्पनेवर आधारित या तीर्थक्षेत्राचा विकास होणार असून, त्यासाठी जांभा दगडाचा वापर केला जाईल. वढा तीर्थक्षेत्र व पर्यटन विकासाच्या याप्रकल्पासाठी ४४ कोटी रुपये प्रस्तावित आहे. दोन वर्षात २५ कोटी रुपये उपलब्ध करून दिल्यास उर्वरित निधी खनीज विकास निधी व नियोजन समितीतून देता येईल. वढा येथे साक्षात 'प्रति पंढरी' साकारण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, असेही ते म्हणाले.

नदीच्या संपूर्ण लांबीमधील स्वच्छता व खोलीकरणासाठी (१७ किमी.) अंदाजित २५ कोटी, नदीच्या डाव्या किंवा उजव्या बाजूने एक किमीपर्यंत नदीतट विकास व सौंदर्यीकरण व सुशोभीकरणाची कामे अंदाजित किंमत २०० कोटी, दाताळा पुलाखालील भागात २२८ मीटर लांबीच्या बंधाऱ्याचे बांधकाम अंदाजित किंमत २० कोटी, नदीच्या डाव्या व उजव्या तिरावरील सहा किलोमीटर संरक्षक आधार भिंत व माती भिंतीच्या बांधकामाकरीता अंदाजित ३२० कोटी व इतर करावयाची कामे ७ कोटी असे एकूण अंदाजित ५७२ कोटींचा प्रकल्प प्रस्तावित असल्याची माहिती अधिक्षक अभियंता (पाटबंधारे) पद्माकर पाटील यांनी दिली.

बैठकीला व्हीसीद्वारे जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मीताली सेठी, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, अधीक्षक अभियंता सुषमा साखरवाडे (सा.बा.विभाग), पद्माकर पाटील (पाटबंधारे विभाग), जिल्हा नियोजन अधिकारी गजानन वायाळ, कार्यकारी अभियंता एस.बी. काळे, कुंभे, उपविभागीय अभियंता दि.ना. मदनकर आदी उपस्थित होते.

■■■



# जगातील सुंदर पर्यटन स्थळात सिंधुदुर्ग

कोंड नेस्ट ट्रॅव्हलर या मॅगझिनने यंदाच्या वर्षी भेट देण्यासाठी जगातील ३० सर्वात सुंदर पर्यटन स्थळांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये लंडन, सिसिली, सिंगापूर यासह इस्तंबूल, इजिप्त, माल्टा, सर्बिया, केपवर्दे अशा आंतरराष्ट्रीय तसेच सिक्कीम, मेघालय, ओरिसा, राजस्थान, गोवा, कोलकाता, भीमताल, केरळमधील आयमानम अशा भारतीय ९ पर्यटन स्थळांत महाराष्ट्रातील एकमेव सिंधुदुर्गचा समावेश केला आहे. जगातील सर्वात सुंदर ३० पर्यटन स्थळांच्या यादीमध्ये सिंधुदुर्गचा समावेश असणे ही खरोखरच आपल्यासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे, अशी प्रतिक्रिया जिल्हाधिकारी के.मंजुलक्ष्मी यांनी दिली.





कोंड नेस्ट ट्रॅव्हलर, इंडिया https://www.cntraveller.in/story/best-places-to-visit-in-india-world-2022-cnt-bhimtal-goa-shillong-seoul/ हे एक मॅगझिन तसेच वेबसाईट असून दरवर्षी जगातील सुंदर पर्यटन स्थळांची यादी ते प्रसिद्ध करतात. त्यामध्ये या पर्यटन स्थळांची संपूर्ण माहिती दिली जाते. जागतिक स्तरावरील पर्यटनास चालना देण्यासाठी त्यांच्याकडून हा उपक्रम दरवर्षी राबवला जातो.

यंदाच्यावर्षी भेट देण्यासाठी निवडण्यात आलेल्या ३० पर्यटन स्थळांमध्ये भारतातील ९ स्थळांचा समावेश आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील एकमेव सिंधुदुर्ग जिल्हा आहे. या यादीमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याची निवड होणे म्हणजेच सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय दर्जाचा जिल्हा असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. स्वच्छ सुंदर किनारे, समुद्रातील प्रवाळ, सिंधुदुर्ग किल्ला, त्सुनामी आयलंड या सारख्या पर्यटनस्थळांविषयी थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. तसेच स्कुबा डायव्हिंगची सोय, समुद्री जीवनाच्या दर्शनाची सोयही उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली आहे. चिपी विमानतळ सुरू झाल्यामुळे सिंधुदुर्गातील पर्यटन सोपे झाल्याने जागतिक पर्यटनाच्या नाकाशावर सिंधुदुर्ग पोहचला आहे.



या यादीमध्ये श्रीलंका, भूतान, कतार, जपान, युएई, इजिप्त, ओक्लाहोमा, सेऊल, गोबन, उझबेकिस्तान यासारख्या पर्यटनस्थळांचा समावेश आहे. आता या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटनस्थळांच्या यादीत सिंधुदुर्गचा समावेश झाला आहे. पर्यटनाच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने सिंधुदुर्ग हे आंतरराष्ट्रीय पर्यटनाच्या नकाशावर आल्याचे दिसून येते.

■■■





# बाळासाहेब ठाकरे जैवविविधता विरंगुळा उद्यान

कोल्हापूर शहरातील रंकाळा तलाव परिसरात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जैवविविधता, विरंगुळा उद्यान साकारण्यासाठी ४ कोटी ८० लाखांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे.


राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी ही माहिती दिली. कोल्हापूर शहरास ऐतिहासिक वास्तूंचा वारसा लाभला आहे. अंबाबाई मंदिरासह ऐतिहासिक रंकाळा तलाव हे देशभरातील लाखो पर्यटकांना आकर्षित करणारे प्रेक्षणीय स्थळ आहे. या तलावाचा इ. स. ८०० ते ९०० च्या कालावधीपासूनचा इतिहास आहे. हा तलाव म्हणजे ‘कोल्हापूरची चौपाटी आणि कोल्हापूरचा मरीन ड्राइव्ह’ म्हणून ओळखला जातो.

गेल्या काही वर्षांत रंकाळा तलावाची दुरवस्था झाली होती. त्याच्या संवर्धनासाठी नगरविकास विभागाकडून १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातील पहिला टप्प्यातील १० कोटींचा निधी महानगरपालिकेस वर्ग





करण्यात आला आहे. या निधीतून पर्यटकांना विरंगुळ्यासाठी अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देणे, आबालवृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, विकसित उद्यान, योगा केंद्र, पदपथ, आदी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने याकडे पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यानुसार रंकाळा तलाव परिसरात हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे जैवविविधता, विरंगुळा उद्यान साकारले जाणार आहे. त्यासाठी ४ कोटी ८० लाख रुपयांच्या निधीस पर्यटनमंत्री ठाकरे यांच्या आदेशाने मंजुरी दिली.



**काय असेल या केंद्रात**

**फूडकोर्ट :**

यात पर्यटकांसाठी वाहनतळ आणि अनौपचारिक थांबण्यासाठी जागा व खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सचा समावेश असणार आहे.

**मत्स्यालय :**

रंकाळा तलावातील खणींचा वापर मोठ्या आकाराच्या मत्स्यपालनासाठी केला जाणार असून, मत्स्य प्रदर्शन केंद्र उभारण्यात येणार आहे.

**फुलपाखरू उद्यान :**

विविध प्रजातींच्या फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी औषधी वनस्पतींसह विविध झाडांची लागवड केली जाणार आहे.

**विरंगुळा केंद्र :**

नागरिकांसाठी योगा केंद्र, आध्यात्मिक केंद्र, फुलोद्यान, पक्षी निरीक्षण केंद्र, सेल्फी पॉइंट, लहानग्यांसाठी स्केटिंग ट्रॅक, खेळणी, पर्यावरणपूरक पाणी निर्गमन यंत्रणा असेल.

**जैवविविधता उद्यान :**

औषधी वनस्पती, फुलझाडे, भाजी, मसाल्यांच्या पदार्थांच्या वनस्पती व दुर्मीळ वनस्पतीची लागवड करणार. प्राणी, पक्षी, कीटक यांना फिरण्यासाठी हे एक प्रकारचे घर असेल. ■■■



# सौंदर्याची 'प्रचिती'

सौंदर्याबाबत एक गाजलेलं वाक्य आहे. जीवन सौंदर्याने भरलेले आहे. ते लक्षात घ्या. लहान मूल आणि हसतमुख चेहऱ्याकडे लक्ष द्या. पहिल्या पावसातील मातीचा वास घ्या आणि वाऱ्याचा अनुभव घ्या. तुमचे जीवन पूर्ण क्षमतेने जगा आणि तुमच्या स्वप्नांसाठी लढा.

जन्माने सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील मिसेस इंडिया प्रचिती पुंडे यांना पाहिल्यानंतर या गोष्टीची प्रकर्षाने आठवण होते. विविध भूमिका जगताना त्यांच्यातील चैतन्याचा झरा कधीही आटला नाही. आत्मविश्वासाची जादुई पुडी, समस्त महिलांना प्रेरणादायी ठरेल अशी एक रोल मॉडेल म्हणून त्यांना पाहता येईल.

प्रचितींकडे होता आध्यात्मिक आशीर्वाद सामाजिक कार्याचा वारसा आणि असं सौंदर्य जे खुलून यायचं होतं, त्यांना स्वतःला जाणवायचं होतं. अवघ्या तेराव्या वर्षी प्रचितींनी आध्यात्मिक पुस्तकं, पोथ्या वाचायला घेतल्या, ते वाचताना त्यांना कळत, अवगत होत गेलं, अरे, हे तर मी अनुभवलं आहे, हे जगले आहे.. त्या वयातच त्यांनी सद्गुरूंची उपासना सुरू केली. हे करतानाच त्या माईंड फुल्लनेस आणि सेल्फ रिफ्लेक्शन कडेही आपसूकच वळल्या. सोबत शैक्षणिक प्रगती होतीच. बारावीनंतर वैद्यकीय शिक्षणासाठी त्यांनी नागपूर गाठलं. इथेही फक्त अभ्यास न करता त्यांनी दूरदर्शन आणि तरुण भारत मध्ये काम केलं. सोबतच, ध्यानाच्या मार्गातूनच पेंटिंग सुरू केलं, कपड्यावर, कॅनव्हास, भित्तिचित्र.. ह्याच बरोबरीने नृत्य कलाही अवगत होती. बरं इतकं करूनही त्यांनी वैद्यकीय शिक्षण, एमबीबीएस केले आहे. पुढे त्यांनी केईएम पुणे येथून भुलतज्ञ शिक्षणही घेतले. यथावकाश त्यांचे एका डॉक्टरशी लग्न झाले. त्यांचे पती, वडील आणि इतर घरातील सदस्य, नातेवाईक बरेचसे स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. प्रचिती यांनी लाईफ कोचिंग साठी Prachiti Kokoro ह्या संस्थेची स्थापना ऑगस्ट २००८ साली केली.

त्यांना त्यांच्याबाबत काही प्रश्न विचारले.

त्यांनी अगदी दिलखुलास उत्तरे दिली.

**तुमची पार्श्वभूमी, तुम्ही नक्की काय आहात?**

प्रचिती: मी लहानपणापासूनच साधी होते फार पण हुशारही तितकीच, सधन घरातून आलेय, आईवडील उच्चशिक्षित, वडील ट्रस्टी आणि डॉक्टर, आई फॅशन डिझायनिंग कॉलेजची मालक आणि मुख्याध्यापिका, घरात शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याचं वातावरण. त्यामुळे माझाही उद्देश नेहमीच सामाजिक कार्याचाच होता. म्हणूनच माझ्यातल्या उपजत आध्यात्मिक ज्ञानाला विज्ञानाची जोड देऊन, स्व–प्रभुत्व मिळवण्यावर मी जोर दिला.

**तुमच्या प्रचिती कोकोरो संस्थेबद्दल सांगा?**

प्रचिती– मी महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवण्यासाठी अभिजीता महिला हस्तकला केंद्राचीही स्थापना केली आहे. आमच्या बंजारा एम्ब्रॉयडरी ला भारत सरकारद्वारे पुरस्कृत ही करण्यात आले आहे. ह्यासोबतच मी लाईफ कोचिंग ही सुरू केले होते, ज्यासाठीच प्रचिती कोकोरो ह्या संस्थेची स्थापना ऑगस्ट २००८ साली केली. त्यासोबतच सीबीटी, एनएलपी सारखे कोर्सेस ही केलेले आहेत. लाईफ कोचिंग, समुपदेशन ह्याने महिलांच्या बहुतांश समस्या, अगदी व्यंधत्व देखील, दूर झाल्याचा अनुभव आहे.

**आपल्या कुटुंबाविषयी सांगा?**

प्रचिती: माझ्यासाठी माझं घर आणि मुलं आधी त्यांच्यासाठी कित्येक वेळा मला थोडं मागे रहावं लागलं, ब्रेक घ्यावा लागला, हातातील काम सोडावं लागलं, पण ते ही गरजेचं असतं त्या त्या वेळेला. मी माझ्या त्या कर्तव्यातही कधीच कमी पडणार नाही.

**सामाजिक कार्याबद्दल काय सांगाल?**

प्रचिती: एक काळ असा गेला की मी थोडी राजकारणात शिरले. पण दोन वर्षे राजकारणात राहून कळलं, हे आपल्यासाठी नाही आणि म्हणूनच आधी मिसेस इंडिया आणि आता मिसेस युनिव्हर्स मला जिंकायचं आहे. तुमच्या आवडीच्या क्षेत्रात तुम्ही सर्वोत्तम ठिकाणी असाल, तर त्याहून बेस्ट काही असेल का?

**ह्या क्षेत्रात कशा आलात?**

प्रचिती: तसं म्हंटल तर अचानकपणेच आणि म्हंटल तर ह्याचाही पाया रोवला गेला होता. मी खरंतर एक अगदीच सामान्य मुलगी होते, म्हणजे जाड भिंगाचा चष्मा, थोडे पुढे आलेले दात, तेल चोपून बसवलेले केस.. पण तरीही, सुरुवातीपासूनच मला फॅशन सेन्स होता. मला इतर गोष्टीत घरातले, नातेवाईक ह्यांनी कितीही नावं ठेवली, तरी माझ्या कपड्यांचं, दागिन्यांचं नेहमीच कौतुक व्हायचं. मला स्वतःलाही ते फार आवडायचं. मुलांसाठी पुण्यात असताना माझ्या हातात एक जाहिरात लागली, पुणे मिसेस इंडियाची. शेवटच्या तारखेच्या अगदी एक दिवस आधी. शेजाऱ्यांची मदत घेऊन फॉर्म भरला. काय करायचं, कसं करायचं, आपल्याला जमेल की नाही ह्या कशाचीही माहिती किंवा खात्री नसतानाही नवीन, वेगळं काही करण्याची इच्छा मला ह्यात



घेऊन गेली. ध्यानीमनी नसताना पण माझे १०० टक्के दिल्यामुळे मी पुणे मिसेस इंडिया जिंकले. अर्थात ह्यामुळे थोडा आत्मविश्वास वाढला होता.

**पुढे काय केलं ?**

प्रचिती: फक्त एक टायटल जिंकणं हा माझा उद्देश कधीच नव्हता. ते जिंकून प्रसिद्धी मिळेल पण माझा अजूनही एक उद्देश होता, माझ्या जिंकण्याचा आणि माझ्या ज्ञानाचा फायदा माझ्यासारख्या इतर अनेक स्त्रियांना व्हावा, त्यांनी प्रेरणा घ्यावी ह्यातून. आपण कोणीतरी असलो की आपल्या बोलण्याचा फरक इतरांवर पडतोच

**आता तुमचं भविष्याचं काही प्लॅनिंग ?**

प्रचिती: मी ते ही करणार आणि माझी सामाजिक कार्याची ओढही मला स्वस्थ बसू देणारच नाही. जसं मी आधी म्हणाले, माझ्या ह्या क्षेत्रात मिसेस युनिव्हर्स हे सर्वोत्तम पद आणि कळस आहे शिखराचा, गाठायला तर हवाच.

■■■






# उन्हाळ्यात टरबूज खा



उन्हाळ्यात शरीराला जास्तीत जास्त पाण्याची गरज भासते, यासाठी आपण विविध प्रकारचे शीतपेयांचे सेवन करतो. मात्र, कृत्रिम शीतपेयांचा आरोग्यावर विपरित परिणाम होत असतो. उन्हाळ्यात शरीराला पाण्याची गरज पूर्ण करणाऱ्या नैसर्गिक साधनांपैकीच एक म्हणजे टरबूज होय. उन्हाळ्याच्या दिवसांत टरबूज खाणे अतिशय गरजेचे आहे, मात्र सोबतच काळजीही घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

उन्हाळ्यात शरीरातील पाणी कमी होते, त्यामुळे डिहायड्रेशनचा धोका संभवू शकतो. अशावेळी टरबूज सेवन केल्याने शरीरातील पाण्याचे प्रमाण योग्य राहते आणि डिहायड्रेशनचा धोका कमी होतो.

टरबुजात आढळणारे आर्जिनिन वंध्यत्व निवारणासाठी उपयोगी आहे. याच्या नियमित सेवनाने तुमचे वैवाहिक जीवनही सुखी राहील.

आपल्या किडन्या सुस्थितीत राहण्यासाठीही टरबूज खाणे फायदेशीर आहे. शिवाय पोटात किंवा छातीत जळजळ होत असेल तर टरबूज खा. ते फायदेशीर ठरेल.

त्वचेच्या आरोग्यासाठी टरबुजाचे सेवन फायदेशीर ठरते. टरबूजात अनेक अँटिऑक्सिडंटस् घटक असतात. त्याचप्रमाणे जीवनसत्व 'क' आणि जीवनसत्व 'अ' यांचाही त्यात मोठ्या प्रमाणात साठा असतो. हे नियमितपणे खाल्ल्याने त्वचा उजळते.

टरबूजात लायकोपीन व कॅरोटिनॉईड मोठ्या प्रमाणात आढळतात. यामुळे हृदयाचे कार्य सुधारते. हे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास व हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते.

टरबुजाच्या सेवनाने कर्करोगही दूर होण्यास मदत होते. टरबुजात असणारे अनेक घटक

कर्करोगाशी सामना करण्यास प्रभावी असतात.

टरबुजात मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या फायबर्समुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे वजन कमी होण्यास मोठी मदत होते.

टरबुजात अनेक प्रकारची जीवनसत्व आणि खनिजं असतात. पण, सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे ९५ टक्के टरबूज हे म्हणजे पाणीच असते. म्हणूनच उन्हाळ्याच्या दिवसांत टरबूज खाण्याचे अनेक फायदे आहेत.

**घेण्यापूर्वी काय काळजी घ्याल?**

टरबूज पिकविण्यासाठी ऑक्सिटोसिन इंजेक्शनचा वापर केला जातो. सरकारने या इंजेक्शनवर कित्येक वर्षांपासून बंदी घातली आहे. तरीही त्याचा सर्रास वापर सुरूच आहे.

ऑक्सिटोसिनने पिकविण्यात आलेल्या फळांचे सेवन केल्याने हार्मोन्स रिलेटेड आजार निर्माण होतात. याचा प्रभाव महिलांवर जास्त होतो.

टरबूजमध्ये सोडियम सॅक्रिन आणि सिंथेटिक रंगाचा वापर केला जातो. टरबूजला गोड करण्यासाठी सॅक्रिन मिसळले जाते, मात्र हे आरोग्यासाठी घातक आहे.

टरबूज घेण्यापूर्वी ते कापा, आवरणाच्या आतील भागाचा रंग फिकट पांढरा किंवा हिरवा असल्यास ते नैसर्गिक पिकलेले समजावे. जास्त लाल असल्यास त्यात सिंथेटिक रंग मिक्स असल्याचे समजावे

टरबूज खाण्यापूर्वी १० ते १५ मिनिट पाण्यात ठेवावे, यामुळे त्याला लागलेले केमिकल्स निघून जातात. टरबूज खूप प्रमाणात चकचकीत वाटत असेल तर तेदेखील पूर्णपणे न पिकण्याची ओळख आहे.

टरबूज घेण्यापूर्वी चारही बाजूने तपासूनच घ्यावे, छिद्र असलेले किंवा कापून ठेवलेले टरबूज घेऊ नये.

■■■





# सौंदर्याचा खजिना 'आंबा'

आंबटगोड स्वाद देणारा फळांचा राजा आंबा आपणा सर्वांनाच आवडतो. आंब्याचे तसे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत; मात्र हा आंबा आरोग्यासाठीच फायदेशीर नव्हे, तर सौंदर्यासाठीही खूप उपयुक्त आहे. जाणून घ्या, आंब्याचे सौंदर्यविषयक उपयोग...

**पिंपल्सवर उपयुक्त**

बऱ्याच जणांच्या चेहऱ्यावर पिंपल्स असतात, याने सौंदर्यात बाधा येते. आपणही पिंपल्सने त्रस्त असाल तर कच्ची कैरी बारीक कापून पाण्यात उकळून घ्या. या पाण्याने दिवसातून दोन वेळा चेहरा धुतल्याने पिंपल्स कमी होण्यास मदत होईल.

**ब्लॅकहेड्स होतात नाहीसे**

बरेच जण ब्लॅकहेड्सनेही त्रस्त असतात. ते नाहीसे करण्यासाठी एका वाटीत आंब्याचा गर घ्या. यामध्ये एक चमचा मिल्क पावडर आणि एक चमचा मध मिसळून पॅक तयार करा. हा पॅक चेहऱ्याला लावून काही वेळाने स्वच्छ पाण्याने धुवा. यामुळे डेड स्किन आणि ब्लॅकहेड्स नाहीसे होऊन त्वचेला नॅचरल ग्लो येईल.

**मुलायम त्वचेसाठी**

कैरी उकडून त्याचा गर चेहरा, गळा, मान यांवर चोळावा व वाळल्यावर चेहरा धुवावा. त्वचा मुलायम व कांतिमान बनेल.

**डार्क स्पॉट होतात दूर...**

चेहऱ्यावरील डार्क स्पॉट घालविण्यासाठी आंब्याच्या सालींचा फेसपॅक उपयुक्त ठरतो. त्यासाठी आंब्यांच्या साली उन्हात वाळवून त्याची पावडर तयार करून घ्या. या पावडरमध्ये दही किंवा गुलाबपाणी मिसळून रोज लावा. हा पॅक डार्क स्पॉट आणि पिग्मेंटेशन दूर करण्यासाठी फायदेशीर आहे.



■■■

fssai
21519215000412

कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) सोलापूर

# कृषि क्रांती सेंद्रीय शेती स्वयंसहाय्यता समुह

Reg.No. ATMA/16/17/3133




मारापूर निर्मित

# यादवबाग

## सेंद्रीय गुळ व काकवी निर्मिती उद्योग

**घटक**
सुक्रोज : ५९.७%,
ग्लुकोज : २१.८%
खनिज : २६%,
पाणी(अंश):८.८६%

पत्ता : मारापूर, ता. मंगळवेढा,जि.सोलापूर.
**9860012695/9561242414**

M.R.P. : ₹ **150/-**
भरतेवेळी वजन : १ किलो

पोटॅशियम, कॅल्शियम,फॉस्फरस, मॅग्नेशियम लोह व ताम्र यांचेही प्रमाण यामध्ये आहे.

## निरोगी व सदृढ आरोग्याचे मुळ म्हणजे.. 'यादवबाग'चा सेंद्रीय गूळ

**महाराष्ट्र ऑरगॉनिक फेडरेशन कडून प्रमाणित केलेला पि.जी.एस. प्रणाली (आत्मा सोलापूर) मध्ये सहभाग असलेला १००% पद्धतीने उत्पादन केलेल्या उसापासून तयार केलेला सेंद्रीय गुळ व काकवी आमचेकडे उपलब्ध आहे.**




### गुळ सेवनाचे फायदे

१. नियमित गुळ खाल्याने पिंपल्सची समस्या दूर होते.
२. सकाळी पाण्यासोबत गुळाचे सेवन केल्या एनिमियाचा त्रास होत नाही.
३. थकवा दूर करण्यासाठी गुळ खावा.
४. नियमित गुळ खाल्याने गॅस आणि पचनाची समस्या दुर होते.
५. जेवणानंतर रोज थोडा गुळ खाल्यामुळे पचन क्रिया सुधारते
६. दम्याचा त्रास गुळाचे सेवन केल्यामुळे दुर होतो.
७. शरीरातील तामपान नियंत्रित करता येते.
८. श्वासासंबंधी काही त्रास असल्यास त्यावर गुळ फायदेशीर ठरतो.
९. घसा बसल्यावरही गुळापासून आराम मिळतो.
१०. शिजवलेला भात आणि गुळ एकत्रित खाल्यास बसलेला घसा व्यवस्थित होतो.
११. तुप आणि गुळ एकत्र करुन खाल्याने कान दुखी बरी होते.
१२. नियमित गुळ सेवन केल्यानं हाडांना मजबुती मिळते.
१३. गुळ आणि चणे एकत्रित खाल्याने प्रोटिन मिळतात.
१४. दुध आणि गुळ नियमित एकत्रितपणे घेतल्यास मासिक पाळीसंबंधीच्या तक्रारी दूर होतात.
१५. गुडघेदुखी होत असल्यास दुध आणि गुळ एकत्रित घ्यावे.
१६. जॉईंट पेनची समस्या दुध आणि गुळ एकत्रित सेवन केल्याने दुर होते.
१७. गुळ आणि दुधाच्या एकत्रित सेवनाने त्वचा मुलायम होते.
१८. गुळ आणि हरभरा एकत्रित सेवनाने स्मरणशक्ति वाढते व ॲसिडिटी आणि दात दुखीची समस्या दूर होते.

आमचा पत्ता


हरिभाऊ यादव, अध्यक्ष
कृषिक्रांती सेंद्रीय शेती, शेतकरी समूह,
मारापूर, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर.- ४१३३०५. मो.नं.: ९८६००१२६९५, ७५८८०११७३०

Postal Reg. - PPR/75/2022-2024


# शिवलक्ष्मी आयुर्वेद क्लिनिक

One Stop Solution For All Hair Problem

स्किन ॲण्ड हेअर केअर सेंटर

Authorised Sub Center Of केशायुर्वेद bvg

भारतातील पहिलेच आयुर्वेदीक हेअर टेस्टींग लॅब व रिसर्च सेंटर



## केसांच्या समस्या

• केस गळणे • केस पांढरे होणे • केसांत कोंडा होणे • अकाली टक्कल पडणे • स्काल्प सोरायसिस • चाई पडणे • केस पातळ होणे • कोरडे, रूक्ष केस • दुभंगलेले केस • सर्व प्रकारच्या केसांच्या समस्या

## त्वचेच्या समस्या

• पिंपल्स (मुरूम) • वांगाचे डाग • तारूण्यपिटीका • अनावश्यक केस (लव) • चेहऱ्यावरील सुरकुत्या • चेहऱ्यावरील खड्डे • चामखीळ, तीळ • सोरायसिस • मस, लासा • स्ट्रेचमार्क्स

### पोटाचे / पित्ताचे विकार

पोट दुखी, आम्लपित्त / ॲसिडिटी/ गॅसेस/ अजिर्ण / अपचन, भूक न लागणे, पोट साफ न होणे, ग्रहणी **(IBS)**, अल्सर, मुळव्याध, भगंदर, फिशर

### इतर महत्वाचे विकार

मधुमेह (डायबेटीज), थायरॉईड, डोके दुखी (मायग्रेन), दमा, खोकला, जूनाट सर्दी, मुत्रविकार, मुतखडा, प्रोस्टेट, किडनी व लिव्हर (यकृत) विकार, वजन वाढविणे, वजन कमी करणे, पुरुषांचे लैंगिक समस्या, शिघ्रपतन, स्वप्नदोष, शुक्रानू कमतरता, स्त्रियांचे विकार, मासीक पाळीच्या समस्या, PCOD / PCOS, झोप न लागणे, मानसिक विकार, लहान मुलांचे विकार, बुद्धी, स्मृती व एकाग्रता वाढविणे.

### वात विकार

संधीवात, आमवात, मणक्याचे विकार, स्लिपडिस्क, सायटिका, स्पॉंडिलोसीस, मान, पाठ, कंबर, गुडघे दुखी, हाता-पायास मुंग्या येणे, पॅरालिसिस

केशायुर्वेद bvg

• अधिकृत केशायुर्वेद सब सेंटर •

शिवलक्ष्मी आयुर्वेद क्लिनिक

राजमाता नगर, एसटी स्टँड जवळ, पोलीस स्टेशन मागे, मंगळवेढा, जि. सोलापूर

डॉ. सौ. तनुजा सुरेश होनमाने (आयुर्वेदाचार्य)

फोन नं. ०२१८८-२९५२२२ रजि.नं.आय- ३९२७७ ए


------------------------------------

------------------------------------

------------------------------------

वर्गणीदार न आढळल्यास कृपया हा अंक पर्यावरण संस्कृती, नागेश्वरी नगर, श्री संत दामाजीनगर, मंगळवेढा जि. सोलापूर ४१३३०५ (महाराष्ट्र) या पत्यावर परत पाठवावा.